# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## पळसदरी धरणात आढळला तरुणीचा मृतदेह

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पळसदरी येथे असलेल्या मध्य रेल्वेच्या धरणामध्ये दुपारी एका २५ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळला आहे. हा मृतदेह अनोळखी तरुणीचा मृतदेह असल्याने पोलिसांना देखील या घटनेबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे.दुसरीकडे त्या तरुणीचा घात कि अपघात याबद्दल चर्चेला ऊत आला असून कर्जत पोलिसांनी त्या तरुणीच्या मृत्यूबद्दल अपघात नोंद केली आहे. पळसदरी येथील मध्य रेल्वेच्या धरणामधील पाणी कोणत्याही कामासाठी वापरले जात नाही. त्यामुळे या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून पाण्याचा वापर केला जात नसल्याने धरण कायम पाण्याने भरलेले असते.या धरणात आज दुपारच्या सुमारास एका तरुणीचा मृतदेह पान २ वर

## तेजस ठाकरे यांची प्रकृती बिघडली



**नवी दिल्ली :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव तेजस ठाकरे यांची प्रकृती बिघडली आहे. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. मात्र, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं वैद्यकीय सूत्रांनी सांगितलं. तेजस यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं होतं. त्यांच्या सर्व चाचण्या केल्यानंतर तेजस यांना आता बरे वाटू लागल्याचं सांगितलं जात आहे. उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे हे रुग्णालयात तेजस यांच्यासोबत असल्याचंही सांगितलं जात आहे.

# श्रीवर्धनमध्ये कारने महिलेला उडविले

|| वर्षभरातील चौथी भीषण घटना

|| मद्यधुंद पर्यटकांनी मांडला उच्छाद



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेल्या श्रीवर्धनमध्ये पुन्हा एकदा मद्यधुंद पर्यटकांच्या बेजबाबदारपणामुळे एक गंभीर अपघात घडला. समुद्रकिनाऱ्यालगत काजू विकून उदरनिर्वाह करणाऱ्या सुमारे ७० वर्षीय निराधार आदिवासी महिलेला भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली.

सायंकाळच्या सुमारास ही महिला नेहमीप्रमाणे समुद्रकिनाऱ्याजवळ उभी असताना भरधाव वेगाने आलेल्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, ती महिला त्या वाहनाच्या पुढील काचेवर आदळली. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी माणगाव येथील रुग्णालयात हलवण्यात आले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, वाहनाचा वेग जास्त होता. अपघातानंतर चालकाने घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र संतप्त नागरिकांनी पाठलाग करून वाहन अडवले व चालकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. चालक व त्याच्या सहकाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून मद्यप्राशन केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. रक्तनमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

गेल्या वर्षभरात तालुक्यात घडलेली ही चौथी गंभीर घटना असल्याचे स्थानिकांनी सांगितले. पर्यटनाच्या नावाखाली बेशिस्तपणा आणि मद्यसंस्कृतीला मोकळीक दिली जात आहे. स्थानिकांचा जीव इतका स्वस्त झाला आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

वर्दळीच्या भागात नियमित ब्रेथ ॲनालायझर तपासणी, कडक नाकाबंदी, सीसीटीव्ही यंत्रणेचे सक्रिय निरीक्षण आणि मद्यधुंद वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबवण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक संघटनांनी दिला आहे.

दरम्यान, पोलीस प्रशासनाने संबंधित चालकाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे. या घटनेमुळे श्रीवर्धनमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वेधक

### हरिचंद्रगडावरील दगड कोसळून भाविक ठार

**ओतूर :** महाशिवरात्रीनिमित्त हजारो भाविकांनी भेट दिलेल्या हरिचंद्रगड येथे रविवारी सकाळी घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका भाविकाचा मृत्यू झाला. गडावरून खाली उतरताना कड्यावरून निसटलेल्या दगडाचा जबर आघात झाल्याने ही घटना घडल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. मृत भाविकाचे नाव सुरेश किसन दामसे असे आहे. ते दर्शन आटोपून जुन्नर दरवाज्याकडील पायवाटेने खाली उतरत होते. यावेळी कड्यावरचा सैल दगड अचानक निसटून त्यांच्या डोक्यावर आणि पाठीवर कोसळला. गंभीर दुखापत झाल्याने ते घटनास्थळीच बेशुद्ध पडले. स्थानिक ग्रामस्थ व इतर भाविकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. दुर्गम पायवाट असल्यामुळे त्यांना खिरेश्वर गावात आणण्यात आले.

### राजगड किल्ल्यावर पर्यटकाचा मृत्यू


**राजगड :** पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक राजगड किल्ला येथे फिरण्यासाठी आलेल्या एका पर्यटकाचा अचानक प्रकृती बिघडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि.१४) दुपारी घडली. संदीप बाळकृष्ण पवार असे मृत व्यक्तीचे नाव आहे. वेल्हे पोलीस ठाणे येथून मिळालेल्या माहितीनुसार, बारामतीतील सहकाऱ्यांच्या गटासह पवार हे सुट्टीच्या निमित्ताने खासगी वाहनाने किल्ल्यावर फिरण्यासाठी आले होते. दुपारच्या सुमारास किल्ल्याच्या बालेकिल्ल्यावरून खाली उतरत असताना त्यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. सहकाऱ्यांनी तत्काळ त्यांना शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला.

### हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरुद्ध गुन्हा

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केल्या प्रकरणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरुद्ध पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत भाजपचे शहराध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांनी पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करुन आक्षेपार्ह वक्तव्य केले. सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची टिपू सुलतान यांच्याशी तुलना करण्यात आली. याबाबतची चित्रफीत समाज माध्यमातून प्रसारित झाली. सपकाळ यांचे वक्तव्य तेढ निर्माण करणारे आहे, असे घाटेंनी म्हटले आहे.

# उरणला भूकंपाचा झटका!

■ महसूल विभागाने केली घटनेची पुष्टी; सुदैवाने कोणतीही जीवित हानी नाही



**। उरण । प्रतिनिधी ।**

**कोप्रोली परिसरात जेएनपीए ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गा नजीक रविवारी (दि. १५) सायंकाळी ७ वाजून २७ मिनिटांनी २.४ रिक्तर स्केलचा धक्का जाणवला. त्यामुळे उरणमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपत्ती व्यवस्थापन विभागाने व उरणच्या महसूल विभागाने या घटनेची पुष्टी केली आहे.**

उरण हे राज्यातील महत्वाचे औद्योगिक ठिकाण आहे. याच तालुक्यातील ज्या कोप्रोली येथे हा भूकंपाचा धक्का जाणवला. त्याच ठिकाणी अवघ्या पाच किलोमीटरवर जागतिक जेएनपीए बंदर आहे. तर एक किलोमीटर अंतरावर भारत पेट्रोलियमचा घरगुती वायू प्रकल्प आहे. त्याचप्रमाणे ओएनजीसीचा तेल शुद्धीकरण प्रकल्प व वायू विद्युत केंद्रही हाकेच्या अंतरावर आहे. काही ठिकाणी घरातील भांडी, पंखे किंवा लटकती वस्तू हलताना दिसल्याचे नागरिकांनी सांगितले. भूकंपाचा धक्का काही सेकंदच जाणवला, मात्र अनपेक्षित असल्याने परिसरात चर्चा सुरू झाली.

जगातील अनेक देशातून आयात करण्यात येणाऱ्या कोट्यवधी लीटर तेलजन्य आणि अति ज्वलनशील पदार्थांचे साठवणूक केंद्रही याच परिसरात आहे. त्यामुळे उरण हे संवेदनशील म्हणून त्याची ओळख आहे. याच परिसरात भूकंपाचे केंद्र निर्माण झाले आहे. उरणच्या नवगर परिसरात रविवारी भूकंपाचा सौम्य धक्का बसल्याची माहिती उरणचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांनी दिली आहे.दरम्यान, हवामान व भूकंप निरीक्षण यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून असून पुढील घडामोडींबाबत प्रशासन सतर्क असल्याची माहिती देण्यात आली आहे. पनवेल-कोप्रोली परिसरात जमिनीला हलका कंप जाणवला. काही नागरिकांनी घरातील भांडी, पंखे तसेच लटकती वस्तू हलताना पाहिल्याचे सांगितले. अनेकांनी खबरदारी म्हणून तात्काळ घराबाहेर पडणे पसंत केले. धक्का काही सेकंदांचा होता, मात्र अनपेक्षित असल्याने परिसरात चर्चांना उधाण आले.भूकंपासारखी नैसर्गिक घटना अचानक घडल्यास नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. विशेषतः धक्का अनपेक्षित असतो आणि त्यामागचे कारण तात्काळ समजत नाही, तेव्हा संभ्रम वाढतो. सोशल मीडियावर अपूर्ण किंवा चुकीची माहिती वेगाने पसरल्यास भीती अधिक तीव्र होते,असे प्रशासनाने सांगितले.

> **या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा मालमत्तेची हानी झालेली नाही. कोणतीही इमारत, रस्ता किंवा सार्वजनिक सुविधांना नुकसान झाल्याची नोंद नाही. भूकंपाची तीव्रता कमी असल्याने तो सौम्य स्वरूपाचा मानला जातो. तरीही नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच अधिकृत सूचनांचे पालन करावे.**
>
> – डॉ. उद्धव कदम, तहसीलदार उरण

### कशी घ्यावी काळजी?

**भूकंपाचा धक्का जाणवल्यास सर्वप्रथम शांत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इमारतीत असाल तर मजबूत टेबल, पलंग किंवा भिंतीच्या कोपऱ्यात आसरा घ्यावा आणि डोक्याचे संरक्षण करावे. लिफ्टचा वापर टाळावा. शक्य असल्यास धक्का थांबल्यानंतर उघड्या आणि सुरक्षित जागेत जावे. घरातील गॅस, वीज जोडणी तपासावी. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ अधिकृत प्रशासन किंवा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे पालन करावे. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी कुटुंबाने पूर्वतयारी ठेवणे आवश्यक आहे. प्राथमिक उपचार पेटी, टॉर्च, पिण्याचे पाणी आणि आवश्यक कागदपत्रे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. आपत्कालीन संपर्क क्रमांक लक्षात ठेवावेत. अशा सजगतेमुळे भीती कमी होते आणि संभाव्य धोके टाळता येतात, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# डोंबिवलीत भीषण आग

## २९ दुचाक्या खाक, ५ जण जखमी



**। डोंबिवली । प्रतिनिधी ।**

रविवारी पहाटे एका भीषण दुर्घटनेने डोंबिवली हादरले. डोंबिवली पूर्व भागातील चेडा नगर येथे एका इमारतीच्या तळघरात लागलेल्या आगीने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत २९ दुचाक्या पूर्णपणे भस्म झाल्या असून, पाच व्यक्तींना किरकोळ जखमा झाल्या आहेत. जखमींवर स्थानिक खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, आणि त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

घटना पहाटे साडेचारच्या सुमारास घडली. राज अपार्टमेंट नावाच्या इमारतीच्या तळघरात असलेल्या पार्किंगमध्ये अचानक आग भडकली. ही इमारत जय भारत शाळेजवळ आहे. आग लागताच धुराचा मोठा लोट इमारतीत पसरला, ज्यामुळे निद्रिस्त रहिवासी घाबरून जागे झाले. त्यांनी घाईघाईने इमारत सोडली आणि बाहेर सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. या गोंधळात पाच जणांना जखमा झाल्या, पण सुदैवाने कोणताही जीवितहानी झाली नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ कारवाई केली. दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले आणि काही मिनिटांतच आग नियंत्रणात आणली. मात्र, तोपर्यंत पार्किंगमधील बहुतेक दुचाक्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. या आगीमुळे मालमत्तेचे लाखों रुपयांचे नुकसान झाले असून, रहिवाशांमध्ये भीती कायम आहे. पहाटेच्या वेळी ही घटना घडल्याने मोठी अनर्थ टळला, अन्यथा परिणाम अधिक गंभीर असते.

आगीचे नेमके कारण अद्याप उघड झालेले नाही. तज्ज्ञांच्या मते, शॉर्ट सर्किट किंवा अन्य तांत्रिक दोष असण्याची शक्यता आहे. पोलीस आणि महापालिकेचे अधिकारी घटनास्थळाची पाहणी करत आहेत आणि तपास सुरू आहे.या घटनेने परिसरातील रहिवाशांना सतर्क केले असून, पार्किंगमधील सुरक्षिततेच्या मुद्द्यावर चर्चा सुरू झाली आहे.

# एटीएसची राज्यभरात कारवाई




**। अहिल्यानगर । प्रतिनिधी ।**

एटीएसने राज्यभरात मोठी कारवाई केली आहे. यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी एटीएसने छापे टाकले आहेत. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसचे सर्च ऑपरेशन राबवण्यात येत आहे. जवळपास २१ ठिकाणी एटीएसचे सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरू आहे. या कारवाईत अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे. दरम्यान या कारवाईने राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगरच्या मुकुंदनगरमध्ये एटीएसने छापेमारी पान २ वर

### संशयितांची कसून चौकशी

विदर्भातील चार ते पाच ठिकाणी आणि अहिल्यानगरमध्ये एटीएसने दहशतवादी कारवायासंदर्भात संपर्कात असलेल्या काही संशयितांचा कसून चौकशी केली. रात्री संशयितांच्या घरावर छापा टाकण्यात आला. पोलिसांनी यावेळी स्थानिक नागरिकांकडून कसून चौकशी केल्याची माहिती पण समोर येत आहे. संभाव्य घातपाताचा संशय बळाव्याने एटीएसने तातडीने ही कारवाई केली. आज महाशिवरात्र आहे. अनेक मंदिरात भाविकांची मोठी गर्दी आहे. तर शिवजंयतीसह इतर प्रमुख कार्यक्रम, सण सुद्धा आहेत. त्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. या कारवाईत काही जणांना ताब्यात घेण्यात आले असले तरी कुणाला अटक केली हे अद्याप समोर आलेले नाही.

### सीईटी नोंदणीसाठी मुदतवाढ

**मुंबई :** विविध व्यावायिक अभ्यासक्रमाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश परीक्षेसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. यापैकी चार अभ्यासक्रमांच्या अर्ज नोंदणीसाठी सीईटी कक्षाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. विधि ५ वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेश नोंदणीला १५ मार्चपर्यंत, तसेच विधि ३ वर्ष, बीएड, एमएड व बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन या तिन्ही अभ्यासक्रमाच्या सीईटी प्रवेश नोंदणीला २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.विधि ५ वर्ष अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत २६ हजार ६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६ रोजी होणार आहे. पान २ वर

## महालगुर-मोरेवाडी येथे बिबट्याची गायीवर झडप

### गाय दगावल्याने वनविभागाकडून सावधगिरीचा इशारा



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील महालगुर मोरेवाडी येथे बिबटयाने गायीवर झडप घालून गायीला भक्ष्य बनविल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली आहे. बिबट्याच्या हल्ल्यात गाय दगावल्याने वनविभागाच्या पोलादपूर येथील वनपाल बाजीराव पवार यांनी ग्रामीण भागातील जनतेला सावधतेचा इशारा दिला आहे.

महालगुर मोरेवाडी येथील शेतकरी अशोक भाऊ मोरे यांची दुभती गाय शनिवारी घरी परत आली नसल्याने रविवारी सकाळी शोध घेतला असता त्यांना जंगलातील दूर्गम भागात गायीच्या गळयावर बिबट्याच्या दाताचे व्रण आणि पोटावर नखांच्या खोल पंजाचे ओरबाडणे दिसून आले. गायीच्या शेपटीकडील भागाचे मांस बिबट्याने फस्त केल्याचे दिसल्याने बिबटयानेच शिकार केल्याची खात्री पटली. गाय दगावल्याने शेतकऱ्याचे दुधदुभत्याचे नुकसान झाले आहे. बिबट्याने गायीची शिकार केल्यामुळे महालगूर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या घटनेनंतर बिबट्याच्या बंदोबस्ताची मागणी ग्रामस्थांकडून वनविभागाकडे होत आहे. या घटनेबाबत अशोक मोरे यांनी वनविभागाला निवेदन दिल्यानंतर वनपाल बाजीराव पवार व वनरक्षक अमोल रोकडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला.

महालगूर मोरेवाडीतील शेतकऱ्याच्या गायीची बिबट्याने शिकार केल्याबाबत पान २ वर

# कोर्लई जिल्हा परिषद मतमोजणीत अनियमिततेचा आरोप

## मुंबई उच्च न्यायालयात रिट; स्थानिक आमदारांच्या दबावाचाही आरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कोर्लई जिल्हा परिषद गटातील निवडणुकीच्या मतमोजणीत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप पराभूत उमेदवार यांनी केला असून या प्रकरणी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी निवडणूक कर्मचाऱ्यांवर दबाव आणल्यामुळे संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया एकतर्फी पार पडल्याचाही आरोप पराभूत उमेदवारांकडून करण्यात आला आहे.

९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या मतमोजणीत एकूण ३९ ईव्हीएम मशीनची पाच फेऱ्यांत मतमोजणी करण्यात आली. मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करून मतमोजणी प्रक्रियेत फेरफार करण्यात आल्याचा आरोप पराभूत उमेदवारांने आपल्या अर्जात नमूद केला आहे.

फॉर्म व्हीएम-४ मध्ये ईव्हीएममधील आकडेवारी नोंदविताना आवश्यक त्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नसल्याचे तसेच काही मतदान केंद्रांवरील मतसंख्या आणि नोंदविलेल्या आकडेवारीत तफावत आढळल्याचे पराभूत उमेदवाराने म्हटले आहे. विशेषतः मतदान केंद्र क्र. ३७-१ मधील आकडेवारीबाबत गंभीर शंका पराभूत उमेदवाराकडून उपस्थित करण्यात आली आहे. शिंदे गट शिवसेनेच्या पराभूत उमेदवार यांना विजयी करण्याच्या उद्देशाने निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकारी व पर्यवेक्षक यांनी पक्षपातीपणे काम केल्याचा आरोप पराभूत उमेदवाराकडून करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांच्यावर पान २ वर

पुढच्या वर्षीपासून अंमलबजावणी | उत्तरपत्रिका तपासणीसाठी एआयची घेतली जाणार मदत

# बोर्डाच्या पेपरची ऑनलाईन तपासणी



**। रायगड । प्रतिनिधी ।**

इयत्ता दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे बोर्डाच्या परीक्षेचे पेपर आता ऑनलाइन तपासले जाणार आहेत. चुकीच्या उत्तराला गुण देणे, अक्षरातील अदलाबदल, अशा बाबी ओळखण्यासाठी एआयचा देखील मदत घेतली जाणार आहे.

हा नवा पॅटर्न २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून राबविला जाणार असून बोर्डाने तसा प्रस्ताव शासनाला पाठविल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

राज्यात दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची सुमारे १५ हजार केंद्रांवर परीक्षा होते. पेपर संपल्यावर तेथून उत्तरपत्रिका संकलित करून सर्व केंद्रांवरील उत्तरपत्रिका ठरावीक शाळांमध्ये जमा केल्या जातात. तेथून बोर्डाच्या माध्यमातून विषय शिक्षकांना तपासणीसाठी पाठवाव्या लागतात. त्यामध्ये उत्तरपत्रिका अनेकांच्या हाती पडतात आणि गैरप्रकाराला वाव मिळतो. दुसरीकडे विषय शिक्षकांनी तपासलेल्या उत्तरपत्रिका मॉडरेटरकडे (नियंत्रक) जमा करायच्या, तेथूनपुढे चीफ मॉडरेटरला द्याव्या लागतात. आता ही पारंपारिक पद्धती बदलली जाणार असून त्यामुळे वेळ, श्रम व खर्चात तोठी बचत होणार आहे.या नव्या पॅटर्नतध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचाही पान २ वर

### अशी असणार नवी पद्धत

नव्या पद्धतीनुसार पेपर संपल्यावर त्याच केंद्रांवर उत्तरपत्रिकांचे ऑनलाइन स्कॅनिंग होईल. बोर्डाला विषयनिहाय त्या उत्तरपत्रिका दिसतील. उत्तरपत्रिका तपासणाऱ्या विषयनिहाय शिक्षकांची माहितीही बोर्ड जमा करणार आहे. त्यानुसार प्रत्येक विषयाच्या उत्तरपत्रिका त्या विषय शिक्षकांना त्यांच्या लॉगिनवर तपासणीसाठी जातील. त्यानंतर संबंधित शिक्षकांना घरी, शाळेत किंवा अन्य कोण्याही ठिकाणी उत्तरपत्रिकांची तपासणी मोबाईल, टॅब किंवा त्यांच्याकडील संगणकावर करता येईल, असा हा नवा पॅटर्न असणार आहे.

# श्रीवर्धनला भेडसावताहेत अरुंद रस्ते अन् पाणी प्रश्न

**। श्रीवर्धन । आनंद जोशी ।**

श्रीवर्धन बीचचे झालेले सुशोभीकरण, श्रीवर्धनकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांचे नूतनीकरण या कारणांमुळे श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगरगावांचे पर्यटन क्षेत्र भरभरुन वाढले आहे. शनिवार रविवारची सुट्टी वा अन्य सुट्ट्या जोडून आल्या की पर्यटकांच्या वाहनांनी, शाळांच्या सहलींच्या मोठ्या बसेसनी रस्ते इतके भरुन जातात की, स्थानिक नागरिकांना रस्यावरुन चालायलाही भीती वाटते. या सगळ्याचे कारण श्रीवर्धन शहरातील अरुंद रस्त्यात दडले आहे.शहरातील पूर्वीचे रस्ते इतके अरुंद आहेत की ते पर्यटकांच्या वाहनांच्या वाढलेल्या प्रचंड संख्येला पुरत



नाहीत.त्यामुळे रस्ते पुरेसे रुंद करणे किंवा तातडीने एकदिशा मार्ग करण्याशिवाय अन्य पर्याय दिसत नाही.

श्रीवर्धन शहरातील रस्ते रूंदीकरण झाले नाही तर अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत राहील यात शंका नाही.

श्रीवर्धनला भेडसावणारा दुसरा यक्षप्रश्न म्हणजे पिण्याच्या पाण्याचा.श्रीवर्धन शहराला व आजूबाजूच्या काही गावांना रानवली येथील मातीच्या धरणातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.शिवाय श्रीवर्धन येथे काही मोजक्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या विहिरीही आहेत. अनेक वर्षे रानवली धरणावर जलशुद्धीकरण प्रकल्पही नव्हता.परंतु दोन-तीन वर्षांपूर्वीच धरणातून शहराकडे येणा-या सर्व जलवाहिन्या बदलण्यात आल्या.महत्वाचे म्हणजे धरणावर जलशुद्धीकरण प्रकल्पही कार्यान्वित झाला.या प्रकल्पाचे २०२३ साली भूतपूर्व उप मुख्यमंत्री कै.अजितदादा पवार यांचे हस्ते आणि खा. सुनील तटकरे व ना. आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत थाटामाटात उद्घाटनही झाले होते. परंतु एवढे सारे होऊनही सध्याची श्रीवर्धन शहरातील पाणीपुरवठ्याची स्थिती चिंताजनक आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये.धरणापासून शहराकडे येणारे पाण्याचे पाईप्स व जॉईंटस वारंवार ठिकठिकाणी लिकेज होतात. त्यामुळे नागरिकांना दररोज पिण्याचे शुद्ध पाणी नियमितपणे नळाद्वारे मिळेलच याची खात्री नसते. नगर परिषदेकडून अधूनमधून पिण्याचे पाणी नागरिकांनी जपून वापरावे असे आवाहन ध्वनिक्षेपकावरुन केले जाते.तसेच मुख्य पाईप लाईन्स टाकतांना मुख्य जलवाहिनीला ठिकठिकाणी एअर व्हॉल्व बसविण्यात आले आहेत. त्यामुळे जलवाहिनी फुटण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे विशिष्ट अंतरावर मधूनमधून असे व्हॉल्व बसविण्यात आले आहेत.मात्र शहरातील गंद्रे नाका व अन्य काही ठिकाणी या व्हॉल्व्हमधून

बऱ्याच वेळा पाणी गळती होत असून कित्येक लीटर्स पाणी वाया जातांना दिसते.नवीन पाईप लाईन्स व जल शुद्धीकरण प्रकल्पासाठी काही कोटी रुपये खर्चून देखील पाण्याचे रडगाणे कायम असल्याने न.प.प्रशासनाबद्दल तीव्र नाराजी पसरल्याचे दिसून येते.महत्वाचे म्हणजे नगर परिषदेच्या काही महिन्यांपूर्वीच निवडून आलेल्या नूतन बॉडीला या सर्व समस्यांना विनाकारण तोंड द्यावे लागत आहे हे मात्र खरे.

# म्हसळा येथे श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा शहरामध्ये श्री संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती अतिशय उत्साहामध्ये झाले. यामध्ये गोर बंजारा समाज सामाजिक मंडळ कार्यालय येथून संत सेवालाल महाराज यांची वाजत गाजत मिरवणूक आणि बंजारा समाजातील जनतेनी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात गायनाच्या माध्यमातून मिरवणूक काढली.

यामध्ये बंजारा समाजातील महिलांनी पारंपारिक वेषभुषा परिधान करून आपले नृत्य सादर केले तसेच बंजारा समाजामध्ये निसर्गपूजा ही मानली जाते त्यामध्ये सर्व महिलांनी कलश आणि पूजा कलश श्रीफळ आपल्या डोक्यावर घेऊन पूर्ण म्हसळा शहरातून बंजारा समाज संस्कृती दर्शन दाखवत फेरी काढण्यात आली. त्यानंतर कार्यक्रमांमध्ये सर्व समाज बांधवांचे अध्यक्ष धेनु चव्हाण आणि बंजारा समाज यांच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच सर्व खाण व्यवसाईक आणि सर्व व्यापारी खाणीचे म ुकादम या सर्वांचा आणि म्हसळा तालुक्यातील बंजारा व्यापारी यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष धेनु चव्हाण गोर बंजारा समाज, उपाध्यक्ष शंकर चव्हाण, सचिव रमेश राठोड, खजिनदार देवेंद्र पवार गोर बंजारा समाज म्हसळा तसेच अनिल पवार, व्यंकू पवार, उमेश चव्हाण विश्वनाथ पवार, अशोक राठोड, रमेश चव्हाण, भागुबाई चव्हाण, सीताबाई चव्हाण, विमलाबाई राठोड, नंदिनी चव्हाण, प्रकाश जाधव, ललिता प्रकाश जाधव, रतन सिंग चव्हाण, राजू चव्हाण, मल्लेश राठोड सर्व बंजारा समाज कर्मचारी आणि बंजारा समाजातील श्री संत सेवालाल महाराज सर्व बंजारा समाज उपस्थित होता. त्यामध्ये सर्व शिक्षक मुख्याध्यापक सर्व कर्मचारी तसेच सर्व मुकादम व्यावसायिक आणि गोरबंजारा बांधव उपस्थित होते.

त्या सर्वांचे गोरबंजारा सामाजिक मंडळ यांच्या वतीने हार्दिक आभार व्यक्त करण्यात आले. अशा पद्धतीने अतिशय उत्साहात श्री संत सेवालाल महाराज महाभोग लावून जयंती साजरी करण्यात आली.

पान १ वरून

## महालगुर-मोरेवाडी येथे बिबट्याची गायीवर झडप

वनपाल बाजीराव पवार यांनी,नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन करून रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करू नये, हातात काठी व बॅटरी घ्यावी, लहान मुलांना एकटे सोडू नये, रात्रीच्या वेळी आजूबाजूला फटाक्यांचा आवाज करावा म्हणजे बिबट्यासारखे हिंस्र प्राणी गाव परिसरात थांबणार नाहीत तसेच गुरांचा वाडा व्यवस्थित बंदिस्त ठेवावा, वाडयाला कुंपण असावे, गुरे रानात मोकळी सोडू नयेत,असे आवाहन केले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या वन्यजीव गणनेमध्ये बिबटयाच्या वास्तव्याची लक्षणे व चिन्हे पोलादपूर वनविभागाला दिसली नसताना कोतवाल भागात काहींना बिबट्या निवडणुक काळात भरदिवसा वाहनासमोरून जाताना दिसल्याचे फोटो व्हायरल झाले होते.

## बोर्डाच्या पेपरची ऑनलाइन तपासणी

(एआय)वापर केला जाणार आहे.

चुकीच्या उत्तराला गुण देणे, अर्धवट उत्तराला पूर्ण गुण देणे अशा प्रकाराला एआयमुळे आळा बसेल, असा विश्वास बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. मध्यप्रदेशात हा पॅटर्न पहिल्यांदा राबविण्यात आला. त्यानंतर आता सीबीएसई बोर्डाने हा पॅटर्न अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ हा पॅटर्न राबविणार आहे.

## एटीएसची राज्यभरात कारवाई

केली.मध्यरात्री एटीएसनेही छापेमारी केली.गोपनीय पद्धतीने मुकुंदनगरमधील नागरिकांची चौकशी करण्यात आली. मुकुंदनगर हा मुस्लिमबहुल भाग म्हणून ओळखल्या जातो. गेल्या दोन ते तीन वर्षात औरंगजेबाचं उद्दातीकरणाचा प्रयत्न असो वा पाकिस्तानच्या घोषणा असो अहिल्यानगर हे चर्चेत आले आहे. यापूर्वी अहिल्यानगरमध्ये अल्पसंख्यांक समाजाच्या तरुणांची माथी भडकवण्याचे प्रयत्न पण समोर आले होते. त्यानंतर आता एटीएसच्या छापेमारीने पुन्हा एकदा हा भाग चर्चेत आला आहे.

दुसरीकडे यवतमाळ जिल्ह्यात एटीएसची २० पथक दाखल झाले आहेत. एटीएसकडून उमरखेड, पुसदमध्ये संशयितांची कसून चौकशी करण्यात येत आहे. या कारवाईत वरिष्ठ आयपीएस अधिकारी ही सहभागी झाले आहेत. राज्यात एटीएएसने रात्रभर गोपनीय कारवाई केली. उमरखेड आणि पुसदमध्ये एटीएसचे २० पथक तळ ठोकून आहेत. रात्री त्यांनी अनेकांची चौकशी केली. तर काही तरुणांना, संशयितांना ताब्यात घेतले आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात रात्रभर कारवाई करण्यात आली. ही कारवाई अत्यंत गोपनिय पद्धतीने करण्यात आली. रात्री अनेकांची चौकशी करण्यात आली.

## कोर्लई जिल्हा परिषद मतमोजणीत अनियमिततेचा आरोप

प्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १३४ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, तसेच नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करून फेरमतमोजणी करावी, अशी मागणी अर्जातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणी दाद मागण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकेवर सोमवारी सुनावणी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. 'मेरिटवर आम्हालाच न्याय मिळेल,' असा विश्वास पराभूत उमेदवाराने व्यक्त केला आहे.

## पळसदरी धरणात आढळला तरुणीचा मृतदेह

आढळून आल्याची माहिती कर्जत पोलिसांना मिळाली.त्यानंतर कर्जत पोलिसांनी खोपोली येथील हेल्प फाउंडेशनला मदतीसाठी पाचारण केले.दुपारी चार वाजण्याच्या सुमारास हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठीलकर यांच्यासोबाबत अन्य कार्यकर्ते तेथे पोहचले आणि त्यांनी धरणाच्या पाण्यात उतरून त्या तरुणीचा मृतेद पाण्याबाहेर काढला.सदर तरुणीचा मृतेह धरणाच्या पाण्यात काही मीटर खोलवर आढळला असून त्या तरुणीचे वय साधारण २५ वर्षे असावे असा अंदाज कर्जत पोलिसांना लगावला आहे. तरुणीचा कदाचित धरणाच्या पाण्यात पाय घसरला असेल किंवबा घातपात करून त्या तरुणीचा मृतदेह पाण्यात टाकला असेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

या धरणाच्या पाण्यात दरवर्षी दोन तीन मृतदेह आढळून येत असतात आणि त्यामुळे कर्जत पोलिसांसाठी या तरुणीचा मृत्यू तपासाचे आव्हान असणार आहे. कर्जत पोलीस ठाणे येथे त्या अनोळखी तरुणीच्या मृत्यूची नोंद ०९/२०२६ नुसार आकस्मिक मृत्यू अशी करण्यात आली आहे.

## सीईटी नोंदणीसाठी मुदतवाढ

गतवर्षी या प्रवेश परीक्षेसाठी ३५ हजार ७४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्याचप्रमाणे विधि ३ वर्ष अभ्यासक्रमासाठी ६२ हजार ५०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा १ ते २ एप्रिल २०२६ दरम्यान होणार आहे. विधि ३ वर्ष या प्रवेश परीक्षेसाठी गतवर्षी ९४ हजार ५०६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

बीएड, एमएड या अभ्यासक्रमासाठी ८५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. बीपीएड या अभ्यासक्रमासाठी ४ हजार २७९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. बीएड , एमएड या अभ्यासक्रमाची प्रवेश ९ एप्रिल २०२६ रोजी, तर बीपीएड या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ४ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. तर याची फिल्ड परीक्षा ५ ते ७ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. बीएड , एमएड या प्रवेश परीक्षेसाठी १ हजार १३९, तर बीपीएड या प्रवेश परीक्षेसाठी ६ हजार ५९८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या http://www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संगणकाधारित पद्धतीने ऑनलाईन घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी पुढील अद्ययावत माहिती, तपशीलवार वेळापत्रक आणि परीक्षेशी संबंधित सूचनांसाठी नियमितपणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाकडून करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं. /हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. अमजद मुश्ताक लोगडे जुबेर मुश्ताक लोगडे, मतीन मुश्ताक लोगडे, माजिद मुश्ताक लोगडे, मुजफर मुश्ताक लोगडे, मुबीन मुश्ताक लोगडे, अल्मास हसन कोलेकर यांचे कुळमुखत्यारी म्हणुन श्रीम. तहसीन रमीज पालटे | १२९/२ | ००-०९-०० | १-२५ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १६/०२/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

प्रपत्र क्र. १६
रजि. एडी/स्पीड पोस्ट, चिटकविणे, दस्ती मार्फत
भारत सरकार
वित्त आणि कंपनी व्यवहार मंत्रालय
डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक अफेअर्स (बँकिंग डिव्हिजन)
**मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. १**
एमटीएनएल भवन, २रा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५

**वसुली कार्यवाही क्र. १८० सन २०२३**
**मधील**
**जप्तीचे वॉरंट**

**पुढील तारीख : १५/०१/२०२६**
**निशाणी क्र. १४**

**पंजाब नॅशनल बँक** ...प्रमाणपत्र धारक
**विरूध्द**
**अलायन्स सिक्युरिटी सॉल्युशन्स प्रा. लि. आणि अन्य** ... प्रमाणपत्र कर्जदार

प्रति,
ज्याअर्थी तुम्ही प्रतिवादींनी सन्माननीय पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. I, मुंबई यांनी काढलेल्या ओ. ए. क्र.२७५ सन २०१७ मधील वसुली प्रमाणपत्रानुसार तुमच्याद्वारे देय व्याज आणि खर्चासह रु. १३,०५,९४,१७९.६२ (रुपये तेरा कोटी पाच लाख चौऱ्याण्णव हजार एकशे एकोणऐंशी आणि पैसे बासष्ट मात्र) ही रक्कम चुकती करण्यात कसूरवार ठरले आहात.
वरील प्रकरणातील खालील नमूद मिळकत निम्नस्वाक्षरीकारांनी जप्त केली आणि आणि प्रभार निर्माण केले आहेत.
आदेश देण्यात येत आहेत की, तुम्हाला याद्वारे कोणत्याही मार्गाने खालील नमूद मिळकत हस्तांतर किंवा प्रभार निर्माण करण्यापासून निम्नस्वाक्षरीकारांच्या पुढील आदेशापर्यंत प्रतिबंध आणि मनाई करण्यात येत आहे आणि की सर्व व्यक्तींना असे हस्तांतर, अन्यसंक्रमण, कब्जा किंवा प्रभारान्वये कोणताही लाभ घेण्यापासून मनाई करण्यात येत आहे.

**स्थावर मिळकतीचे परिशिष्ट**
१. प्रक क्र. ३ च्या मालकीची गाव कुंभिवली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित सर्व्हे क्र. ५७, हिस्सा क्र. १ धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, मोजमापित साधारण १.६९ हेक्टर्स.
सदर ९ डिसेंबर, २०२५ माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह दिले,

सही /-
**(श्री. यतिन कुमार सिन्हा)**
वसुली अधिकारी,
डीआरटी-I, मुंबई

शिक्का

यांना प्रत:
१. संबंधित सोसायटी,
२. बीएमसी ॲथॉरिटी/लोकल सिविक बॉडी/तलाठी
३. संबंधित उप निबंधक-प्रधा बँक रुल्स नुसार संबंधित उप निबंधकांच्या रेकॉर्डमध्ये नोंदविलेल्या वरील नमुद मिळकतीचा प्रभार घेऊ शकतात.
**१. अलायन्स सिक्युरिटी सॉल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय कॅसिनाथ बिल्डिंग, १ला मजला, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१. आणि खैतान भवन, ५वा मजला, १९८, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई- ४०००२०.
**२. श्री. योगेश चड्ढा**
फ्लॅट क्र. ७८, कल्पतरु पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, डॉ. एस. एस. राव रोड, कल्पतरु हॅबिटेट, बी विंग, परळ, मुंबई- ४०००१२.
**३. श्रीम. मानसी हृषिकेश शाह**
२रा मजला, अंजली आपर्टमेंटस्, गुलमोहर रोड, जेव्हीपीडी, जुहू, विलेपार्ले पश्चिम, मुंबई- ४०००४९.
**४. श्री. हृषिकेश शाह**
२रा मजला, अंजली आपर्टमेंटस्, गुलमोहर रोड, जेव्हीपीडी, जुहू, विलेपार्ले पश्चिम, मुंबई- ४०००४९.

### जाहिर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेले मालकांचे नांव या कॉलममध्ये नमूद केलेले मिळकतींचे मालकांकडून त्यांचे नावासमोरील कॉलममध्ये नमूद केलेली त्यांचे मालकीची खुद्द, ताबा, वहिवाटीतील जमीन मिळकती आमचे अशिलांनी कायम खुष खरेदी घेणेबाबत व्यवहार ठरविला आहे. सदर मिळकत ही निर्वेध असल्याचा हवाला जमीन मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे, त्या जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**पत्ता- मौजे वराठी, ता. रोहा, जि. रायगड**

| मालकाचे नांव | गट नं. | खाते क्रमांक | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| विनोद काशिनाथ पाटील | १०/१ | ३५९ | ०-३४-०० | ०=२३ |
| सुनिता विनोद पाटील | १०/२ | ३६० | ००-५६-५० | ०=३८ |

तरी सदरचे मिळकतींवर कोणाचा कोणताही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कबजा, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रिक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणारे ॲडव्होकेट यांजकडे लेखी रजिस्टर पोस्टाने हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची वरील मिळकत ही पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल रजिस्टर्ड खरेदीखताने सदरच्या मिळकती कायम खुष खरेदी घेतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे कळावे,

दि. १४/०२/२०२६

**ॲड. समीर पांडुरंग सानप**
ऑफिस- वर्धमान दर्शन ईमारत, रोहा-कोलाड रोड, दमखाडी, रोहा, ता. रोहा
मो. ९७६७२५३११२

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. चंद्रकांत वसंत सुर्वे, श्री. दत्ताराम बापू सुर्वे, श्रीम. वनिता वसंत सुर्वे सर्व राहणार मौजे कोंझरी, ता. म्हसळा, जि. रायगड यांनी मौजे कोंझरी, ता. म्हसळा, जि. रायगड येथील भुमापन क्र. व उपविभाग २६२, एकूण क्षेत्र १०-३९-००, आकार ४.२० लागवड - गवतपड आमच्या अशिलांच्या क्षेत्राची मिळकत या मिळकतीबाबत श्री. मनाज अमृतलालजी व्यास रा. श्री. नारायण कृपा, १६ बस स्टॉप, बेल्डीरज नगर, येरगाव, पुणे यांना दि. ०८/१२/२०१४ रोजी दुय्यम निबंधक साो म्हसळा यांचे कडे दस्त क्र. ८९१/२०१४ अन्वये कुल मुखत्यारपत्र लिहून दिले होते परंतु श्री. मनोज अमृतलालजी व्यास यांनी आमच्या अशिलांच्या विश्वासाचा भंग केल्याने आमचे अशिल सदरचे कुल अखत्यारपत्र नोटीस पाठवून रद्द करीत आहेत. करीता आमचे अशिल संबंधितांना रजिस्टर नोटीस देखील पाठवित आहेत.

तरी सर्व जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोंझरी, ता. म्हसळा, जि. रायगड येथील गट क्र. २६२ या मिळकतीबाबत दस्त क्र. ८९१ /२०१४ या कुळ अखत्यारपत्राद्वारे कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर व्यवहाराबाबत आमचे अशिल कोणत्याही प्रकारे बांधील राहणार नाहीत. व होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर परीणामांची जबाबदारी ही संबंधीतांची असेल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

श्रीवर्धन
दिनांक : १५/०२/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S.LL.B
खरेदीदाराचे वकील
महेश्वर आळी - श्रीवर्धन, मु. पो. ता. श्रीवर्धन, जि. रायगड
मो. नं. ७२७६५६३६६७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे - चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) पुष्पसेन जगन्नाथ पाटील, २) जयश्री रमेश मोरे, ३) उषा यशवंत मांजरेकर, ४) वासंती जगन्नाथ पाटील, ५) विनोदीनी जगन्नाथ पाटील यांचे कडून कायम मालकी हक्काने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | ८९६/१ | जिरायत ००-१५-६०<br>बागायत ००-१०-००<br>पो.ख. ००-०२-८०<br>एकूण ००-२८-४० | १०.५२ |

वर वर्णन केलेली मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्ट, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क, सरकारी, निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १५/०२/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुबोध सुधाकर गायकवाड वगैरे ८, रा. पुणे यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौने- पाच्छापुर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ३६५ | ०-६९-६० | ०.६६ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तीनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १६/०२/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### ग्रुप ग्रामपंचायत सुरव तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड

**जाहीर निविदा जा.क्र. ६९/२०२६ दिनांक : १३/०२/२०२६**

ग्रुप ग्रामपंचायत सुरवतर्फे तळे यांचेकडील १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार यांचेकडून जाहीर निविदा मागणविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामांचे परिमाण (संख्या) | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी (रू.) | इसारा फी १% (रू.) | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणेचा दिनांक व वेळ | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजिवली रा.जि.प. शाळा शौचालय व पाण्याची टाकी दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग सन २०२१/२०२२ | ६०,०००/- | २००/- | ६००/- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |
| २ | सुरव/निजामपूर विहीर दुरूस्ती व गाळ काढणे | १ | १५ वा वित्त आयोग सन २०२१/२०२२ | ७३,१४८/- | २००/- | ७३१/- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |
| ३ | सुरव/तळे बौद्धवाडी विहिरीचा गाळ काढणे | १ | १५ वा वित्त आयोग सन २०२२/२०२३ | ५४,१८३/- | २००/- | ५४२/- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |
| ४ | राजिवली येथे रेन वॉटरहार्वेस्टिंग करणे | १ | १५ वा वित्त आयोग सन २०२२/२०२३ | ४७,१७५/- | २००/- | ४७२/- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |
| ५ | सुरव/तळे व राजिवली बौद्धवाडी गावातील विहिरीचा दुरूस्ती व गाळ काढणे | १ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ | ३७,७४०/- | २००/- | ३७७/- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |
| ६ | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व विहिरींना जाळी बसविणे. | ३ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ | १,००,०००/- | २००/- | १०३८- | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. १.०० वाजेपर्यंत | दि. २३/०२/२०२६ वेळ दु. ३.०० वाजता | २ महिने |

अटी व शर्तीः- १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२) निविदा स्विकृती अंतिम दि. २३/०२/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही.
३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती / चलन जोडलेली असावी.
४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील.
६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल.
७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल.
८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी.
९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व प्रणालीशी संलग्न असावे.
१२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.
१३) मा. उपअभियंता (बांधकाम) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा.सरपंच ग्रा.पं.सूरव तर्फे तळे यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

ठिकाण : ग्रा.पं. सुरव तर्फे तळे
दि. १३/०२/२०२६

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत सुरव/तळे

प्रशासक साो
ग्रुप ग्रामपंचायत सुरव/तळे

# जिल्ह्यात घुमला ‘बम बम भोले’चा नाद

महाशिवरात्री हा फाल्गुन कृष्ण चतुर्दशीला साजरा केला जाणारा भगवान शिवाचा प्रमुख सण आहे. या दिवशी शिव आणि पार्वतीचा विवाह झाला होता. तसेच, शिवाने तांडव नृत्य केले होते, असेही मानले जाते. हा दिवस अंधार व अज्ञानावर मात करण्याचे, अध्यात्मिक जागृतीचे आणि शिवाची पूजा व उपवास करून आत्मशुद्धी करण्याचे स्मरण आहे. महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील महत्त्वाचा सण असून दरवर्षी फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येत असतो. यंदा हा उत्सव रविवारी (दि.१५) सुट्टीच्या दिवशी आल्याने जिल्ह्यातील सर्व ठिकाणाच्या शिवमंदिरात भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यादरम्यान ‘बम बम भोले’, ‘हर हर महादेव’चा नाद सर्वत्र घुमला होता.



● महाशिवरात्रीनिमित्त अलिबाग जवळील वेश्वी येथील श्री गोकुळेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

## कुंडेश्वर मंदिरात उत्सव साजरा

**| चौल | प्रतिनिधी |**

चौल येथील कुंडेश्वर मंदिर चौक येथे महाशिवरात्रीचा उत्सव रविवारी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सकाळी ७.०० वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली. सकाळी शिवलीलामृत पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर मंदिरात अभिषेक, पूजा-अर्चा आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. दुपारी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संध्याकाळी ४.०० वाजता भजन कार्यक्रम रंगला.



श्री महाकाली प्रसादिक भजन मंडळ-रेवडंडा तसेच बुवा अभिषेक अंजनकुमार तांबळकर यांनी सुमधुर भजन सादर करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. संध्याकाळी ७.०० वाजता दीपोत्सव पार पडला. रात्री ८.०० ते ९.०० या वेळेत राहुल नंदकुमार नाईक यांच्या आयोजनातून जादूचे प्रयोग सादर करण्यात आले. त्यानंतर रात्री ९.०० ते १२.०० या वेळेत महेंद्र पाटील यांनी रिमिक्स मेलोडी कराओके ट्रॅक शो सादर केला.

मराठी व हिंदी गाण्यांच्या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी मंदिर समिती व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम शांततेत आणि आनंददायी वातावरणात पार पडल्याबद्दल आयोजकांनी सर्व भाविकांचे आभार मानले.

## श्रीरामेश्वर मंदिरात अलोट गर्दी



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

महाशिवरात्री निमित्ताने अलिबाग तालुक्यातील चौल येथील दक्षिण काशी अशी ओळख असलेले श्री रामेश्वर मंदिर व परिसर विद्युत रोषणाई, रांगोळी, तसेच फुलमाळांनी सजविण्यात आला होता. महाशिवरात्री निमित्ताने श्री रामेश्वर मंदिर येथे जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. या निमित्त फुल विक्रेते, खेळणी, चणवाले, फेरीवाले, तसेच स्विटमिठाई वाल्यांनी दुकाने थाटली होती. दरम्यान, मंदिरात पुजाअर्चा व दर्शनासाठी मोठ्या भक्तीमय वातावरणात भक्तमंडळींनी गर्दी केली होती. पंचक्रोशीतील अनेक भक्तमंडळींनी श्री रामेश्वर मंदिरात दर्शनाचा लाभ घेतला.



● महाशिवरात्रीनिमित्त मुरूडमधील कोळी सरपाटील कुटुंबांनी समुद्रावर वाळूची शंकराची पिंडी बनवून पूजन केले. त्यानंतर भरतीच्या पाण्याने पिंड समुद्रात विलीन झाली. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## सर्वे येथे महाशिवरात्र उत्साहात

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील प्राचीन पांडवकालीन प्रसिद्ध असलेले सर्वे येथील कावड्याच्या डोंगरावर वसलेल्या सर्वेश्वर मंदिरात महाशिवरात्र उत्साहात साजरी झाली. यादिवशी सकाळी शिवपिंडीची विधिवत पूजा-अर्चा, आरती करण्यात आली.

यानिमित्ताने विविध कार्यक्रम, श्रीशिवलीलामृत ग्रंथ वाचन, भाविकांसाठी सुश्राव्य बहारदार भजनं घेण्यात आले. निसर्गरम्य परिसरात अथांग समद्रकिनारा लाभलेल्या कावड्याच्या डोंगरावरील प्रसिद्ध शिवमंदिरात



परिसरासह मुंबई, पुणे येथील शिवभक्तांनी शिवपिंडीचे दर्शन घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वे ग्रामस्थ व महिला मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## पुरातन मंदिरात महाशिवरात्री उत्साहात

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठणे येथील प्रभू आळी परिसरात असलेल्या पुरातन पेशवे कालीन श्री जुने रामेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या जुने रामेश्वर मंदिरातील सर्व धार्मिक कार्यक्रम साजरे करण्याचे अधिकार येथील कायस्थ प्रभू समाजाच्या विश्वस्त समितीकडे असल्याने यावर्षीही त्यांच्यावतीने मंदिरात दर्शनासाठी



येणाऱ्या शिव भक्तांसाठी शिस्तबद्ध नियोजन व व्यवस्था केली होती. त्यामुळे सकाळपासूनच जुने रामेश्वर मंदिरात शिवभक्त नागरिक, महिलांसह अबाल-वृद्धांची गर्दी झाली होती.



● महाशिवरात्री निमित्त पनवेलच्या विरुपक्ष् मंदिरात हर हर महादेवचा गजर. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## नांदगावच्या मंदिरात भाविकांची गर्दी

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे महाशिवरात्री निमित्ताने श्रीशंकर मंदिरात दर्शनासाठी यशवंतनगर पंचक्रोशीतील हजारो भक्तगणांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मंदिराचे तसेच गावच्या पंच कमिटीचे पुजारी विवेक वामन तथा बाळा ठोसर तसेच सिद्धेश पाटील यांनी पहाटे मंदिरात पुजा केली. त्यानंतर भाविकांची मोठी रांग दर्शनासाठी मंदिरात लागली होती.पंच कमिटी अध्यक्ष उमाकांत रघुनाथ चोरघे व अन्य सदस्य या प्रसंगी उपस्थित होते. यावेळी शंकर मंदिरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गावातील भजनी बुवांनी संगीत भजने सादर



केली. रात्री उशिरापर्यंत तालुक्यातील अन्य ठिकाणच्या भक्तांनीही या प्राचीन मंदिरात येऊन दर्शन घेतले.



● कामोठे येथील प्राचीन शिव मंदिरात पहाटेपासूनच दर्शनासाठी मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. अनेक भक्तांनी नंदीच्या कानात आपले मनोगत व्यक्त करत श्रद्धा व्यक्त केली. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## मुरूडमध्ये धन धारणा शिबिराचे आयोजन

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

स्वामीसमर्थ मठ डोंगरी तर्फे महाशिवरात्री निमित्त मुरुड समुद्रकिनारी धन धारणा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी असंख्य स्वामीभक्तांनी नामस्मरणाचा लाभ घेतला. याप्रसंगी डोंगरी मठाच्या मठाधीपाती त्रिशा पाटील म्हणाल्या की, महाशिवरात्रीनिमित्ये मुरुड समुद्रकिनारी धन धारणा शिबीर घेण्याचे हे ८ वे वर्ष आहे. सकाळी समुद्रकिनारी थंड स्वच्छ वातावरणात स्वामींचे ध्यान व नामस्मरण केल्याने भक्तांच्या मनाच्या व शरीराच्या व्याधींपासून मुक्ती मिळते व मन व शरीर शुद्ध होते, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आज सर्वत्र रक्तदाब व मधुमेह सारख्या रोगाने जग पछाडले आहे.

त्यावर उपाय म्हणून सर्वांनी आजपासून कोणतेही शीत पेय, पॅकिंग केलेले खाद्य पदार्थ खाणे बंद करावे, सतत जमिनीचा स्पर्श होण्यासाठी समुद्रावर चालावे, गोमातेच्या शेणाचा वापर बागेतील जमिनीवर करावा, तसेच पिझ्झा, बर्गर, चायनीझ खाद्य टाळावे. आपले शरीर सुदृढ बनवा, तरच इश्वासचे स्मरण आपल्याकडून होईल, असे त्यांनी सांगितले.

## संगमेश्वर मंदिरात भक्तिमय वातावरण



**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील संगमेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवारी महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी करण्यात आली. पहाटे ४ ते ६ वाजताच्या दरम्यान अभिषेक झाल्यावर भक्तगण दिवसभर मंदिरात दर्शनासाठी येत होते. सायंकाळी साडेसात वाजता मंदिरात महाआरती घेण्यात आली. दरम्यान, संगमेश्वर नगर परिसरात रस्त्याच्या दुतर्फा रांगोळी काढण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण जाणवत होते. तसेच, मंदिराच्या गाभाऱ्यात प्रसाद खरे, सचिन गोरेगावकर यांनी उत्तम अशी सजावट केली होती. आलेल्या सर्व भक्तगण भाविकांचे मंदिर ठिकाणी मंदिर ट्रस्टचे प्रभारी अध्यक्ष संजय साबळे, ट्रस्टी महादेव कनोजे, उमेश मेथा, नगरसेवक दिनेश रातवडकर, दिलीप पारखे, सामाजिक कार्यकर्ते सुनील धुमाळ, सचिन गोरेगावकर, पुजारी हरेश जंगम, शेखर जाधव व सहकाऱ्यांनी स्वागत केले.

## अमृतेश्वर शिवमंदिराला यात्रेचे स्वरूप

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यातील म्हसळा येथील लखमेश्वर, देवघर येथील स्वयंभू अमृतेश्वर, घुम येथील घुमेश्वर, जंगमवाडी येथे मनमेश्वर व पाष्टी कुणबीवाडी येथील शिवमंदिरात महाशिवरात्र उत्सव मोठ्या उत्साही आणि भक्तीभावाने संपन्न झाला. देवघर येथील स्वयंभू अमृतेश्वर शिवमंदिरात पहाटे पासूनच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, म्हसळा येथे राजस्थानी समाजाच्यावतीने पूजापाठ, भजन व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. देवघर अमृतेश्वर येथील महाशिवरात्री कार्यक्रमाचे आयोजन



देवघर आणि देवघर कोंड ग्रामस्थांनी उत्तम प्रकारे केले होते.



● खांदा वसाहतमधील खांदेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त रात्रीपासून दर्शन करता मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. (छायाचित्र: राजेश डांगळे)



● उरण तालुक्यातील सर्व महादेवाच्या मंदिरात ‘बम बम भोले’चा सूर ऐकायला मिळाला. (छायाचित्र: दिनेश पवार)

## नेरळकरांची पायी शिव दिंडी



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कोल्हारे-बोरघाट येथे उगम पावणारी उल्हास नदी, भीमाशंकर डोंगरात उगम पावणारी चिल्हार नदी आणि भिवपुरी धरण येथे उगम पावणारी पेज नदी या तिन्ही नद्यांचा संगम कोल्हारे येथे होतो. त्यामुळे त्रिवेणी संगम म्हणून प्रसिद्ध असलेल्या संगमावर पांडवकालीन शिवमंदिर आहे. या मंदिरात दोन दिवस महाशिवरात्रीचा सोहळा ग्रामस्थ मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

मध्यरात्री दीपोत्सव साजरा करताना मंदीर असंख्य दिव्यांनी उजळले होते. सकाळी महाभिषेक झाल्यानंतर शेकडो भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली. तर, भक्तांना पूजेसाठी लागणारे दुर्वा, फुले, बेल पाने यांची दुकाने परिसरात दिसून येत होती. नेरळ परिसर वारकरी संप्रदाय यांच्यावतीने नेरळ हनुमान मंदिर ते कोल्हारे संगमेश्वर मंदिर अशी पायी दिंडी काढण्यात आली. हरिनामाचा जयघोष करीत नरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही दिंडी निघाली. दिंडीचे स्वागत कोल्हारे विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळाने केले. त्यानंतर तेथे नरेश पाटील यांचे हरी कीर्तन सादर केले.

## महाशिवरात्रीचा उत्साह



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड शहरातील कल्याणी हॉस्पीटलमधील शिवमंदिरात शिवभक्त भाविकांनी ‘बम बम भोलेनाथ’चा जयघोष करत दर्शनासाठी गर्दी केली होती. महाशिवरात्री उत्सवानिमित्त मंदिराला सुंदर फुलांनी व आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. तसेच, मुरूड शहरातील प्राचीन काळातील भोगेश्वर पाखाडी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट मधील शिव मंदिरात भगवान शंकराची विशेष पूजा करण्यात आली.

## उरण तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, पिरकोण, आवरे, खोपटा, चिर्ले, जासई, घारापुरी बेट, केगाव, उरण शहर, उरण कोटगाव रेल्वे स्टेशन, शेवा, सोनारी व दिघोडे या ठिकाणच्या शिवमंदिरात शिवाच्या लिंगाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. मंदिर कमिटी तसेच ग्रामस्थांनी महाशिवरात्री उत्सवानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कळंबुसरे गावात यावर्षी महाशिवरात्री उत्सवाचा शतक महोत्सव साजरा झाला असून आवरे गावातील श्री भोलेनाथ शिवमंदिरात पालखी सोहळ्याचा ७५वा अमृत महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व धुमधडाक्यात साजरा केला गेला. यावेळी मंदिर कमिटी तसेच ग्रामस्थांनी महाशिवरात्री उत्सवा निमित्ताने विविध धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तसेच, यंदा महाशिवरात्रीनिमित्ताने घारापुरी बेटावर भक्तांचा जनसागर लोटला असून गावोगावच्या शिव मंदिरात ही भाविकांनी शिवाच्या लिंगाच्या दर्शनासाठी आप आपल्या कुटुंबांसह गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत होते.

# शेजारी बिऱ्हाड बदलले

बांगलादेशामध्ये अपेक्षेनुसार बांगलादेश नॅशनल पार्टी अर्थात बीएनपीला मोठे बहुमत मिळाले आहे. आजवर तिथल्या सत्तेत शेख हसीना यांचा अवामी लीग हा पक्ष बिऱ्हाड ठोकून होता. आता तिथे बीएनपी हे जुने बिऱ्हाड परतणार आहे. दहा वर्षांपूर्वी बीएनपीवर बंदी होती व अवामी लीगने एकट्यानेच निवडणूक लढवली होती. यावेळी चित्र बरोबर उलटे होते. २०२४ मध्ये शेख हसिना यांचे सरकार उलथण्यात आले. तेव्हापासून हसिना भारतात परागंदा स्थितीत आहेत. मधल्या काळात तिकडे त्यांच्या अनुपस्थितीत खटले चालवून हसिना यांना शिक्षा ठोठावण्यात आली आहे. अवामी लीगवर निवडणूक लढवण्यास बंदी होती. त्यामुळे ही निवडणूक तशी एकतर्फी होणार हे अपेक्षित होते. त्यानुसार बीएनपीला २९९ पैकी २१२ जागा मिळाल्या आहेत. बीएनपीच्या नेत्या व दोनदा पंतप्रधानपद भूषवलेल्या खलिदा झिया यांचे मध्यंतरी निधन झाले. त्याच्या सहानुभूतीचा फायदा त्या पक्षाला मिळणार हेही स्पष्ट होते. या निकालामुळे आपल्या शेजारच्या देशातील अनिश्चितता संपुष्टात येईल ही आनंदाची गोष्ट आहे. शेख हसिनांचे सरकार गेल्यापासून तेथे नोबेल विजेते महंमद युनूस हे काळजीवाहू म्हणून कारभार करीत होते. मात्र या काळात त्यांनी भारताच्या विरोधाचे धोरण स्वीकारले. धर्मांध शक्तींना बळ दिले. आता बीएनपीचे तारीक रहमान यांनी भारताशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचे संकेत दिले आहेत. नरेंद्र मोदी यांनीही रहमान यांना तात्काळ संदेश पाठवून शांती व समृद्धीसाठी एकत्रित काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. रहमान हे तिला प्रतिसाद देतील अशी आशा करायला हरकत नाही. शेख हसिना यांच्या कार्यकाळात रहमान यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते व त्यांना तुरुंगवासही घडला होता. त्यानंतर ते इंग्लंडमध्ये पळून गेले होते व जवळपास सोळा वर्षे तिकडेच होते. या काळात त्यांच्या मातोश्री खलिदा झिया बांगलादेशात किल्ला लढवत होत्या. पण त्याही विविध गुन्ह्यात अडकलेल्या होत्या. हसिनांचे सरकार गेल्यानंतर ही सर्व पापे एकाएकी धुतली गेली व आता रहमान पंतप्रधानपदी विराजमान होणार आहेत.

### जमाते इस्लामीचे यश चिंताजनक

निवडणुकीपूर्वी प्रचाराच्या काळात बांगलादेशातील हिंदूंवरचे हल्ले वाढले होते. वेगवेगळ्या प्रसंगांमध्ये सुमारे ६० हिंदूंची हत्या झाली होती. पण बीएनपीने हिंदूंना सामावून घेण्याची भूमिका घेतली. हिंदूंनीही बहुसंख्येने बीएनपीलाच मते दिली. ज्ञानेश्वर रॉय हे बीएनपीचे उमेदवार ढाक्यामधून मुस्लिम उमेदवाराच्या विरोधात निवडून आले आहेत. आजवर भारताचे शेख हसिना यांच्या अवामी लीगशी अधिक सख्य होते. हसिना यांचे पिता मुजिब उर्र रहमान हे बांगलादेशाचे पहिले नेते होते. परिणामी हसिना व त्यांचा पक्ष ठामपणे पाकिस्तानच्या विरोधात होता. १९७१ च्या लढ्यात पाकिस्तानला मदत करणाऱ्यांवर खटले चालवून त्यांना फाशीची शिक्षा देण्याचा उपक्रमही हसिना यांनी केला होता. त्यात जमाते इस्लामी या पक्षाचे अनेक नेते व कार्यकर्ते सापडले होते. जमाते हा उघडपणे पाकिस्तानशी चुंबाचुंबी करणारा पक्ष आहे. गेली ५० वर्षे बांगलादेशातील मानस ठामपणे पाकिस्तानविरोधी असल्याने जमातचे फार काही चालू शकत नव्हते. पण हसिनाना विरोध करण्याच्या आंदोलनात जमाते इस्लामी व इतर धर्मांध शक्तींचे फावले. त्यांनी डोके वर काढले. ते पुन्हा पाकिस्तानशी जुळवून घेण्याची व भारताशी शत्रुत्व सुरु करण्याची भाषा करू लागले. त्यांना चीनकडूनही फूस असण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यात युनूस यांच्या सरकारने जमाते इस्लामीला पूर्ण सूट दिली. त्याचाच परिणाम म्हणून देशात हिंदूंवरचे हल्ले वाढले व हिंदू-मुस्लिम द्वेष पसरवण्याच्या घटना घडल्या. तिकडे पाकिस्तानचे स्वतःचे दिवाळे निघायची वेळी आली आहे. पण बांगलादेशात पुन्हा घुसता येत असेल तर ते त्याला हवेच आहे. त्यामुळे बांगलादेश व पाकिस्तान यांच्यात व्हिसा न घेता प्रवास सुरू करण्यात आला. शिवाय, पाकिस्तानातून आयात होणाऱ्या मालावरची जकात काढून टाकण्यात आली. जमाते इस्लामीला या सर्व वातावरणाचा फायदा निवडणुकीतही झाला. त्यामुळेच त्याचे तब्बल ७७ खासदार यंदा निवडून आले. आता तो सर्वात प्रबळ विरोधी पक्ष म्हणून वावरेल. बीएनपीला भक्कम बहुमत असले तरी जमाते इस्लामीची उपद्रवक्षमता वाढली आहे. ती भविष्यात त्रासदायक ठरेल.

### संबंध सुधारा

शेख हसिना यांना घालवण्यात तरुण मंडळींचा मोठा पुढाकार होता. ही जेन झीने केलेली क्रांती असेच तिचे वर्णन केले जात होते. विद्यापीठात शिकणारे तरुण विद्यार्थी आंदोलनामध्ये आघाडीवर होते. युनूस यांचे सरकार येण्यातही त्यांचाच वाटा होता. या तरुणांनी नॅशनल सिटीझन्स पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला होता. पण त्याला अवघ्या सहा जागा मिळाल्या. आपल्याकडे २०१४ मध्ये मनमोहनसिंग सरकारविरुध्द अण्णा हजारे यांच्या आंदोलनात तरुणांचा उठाव झाला असे दाखवण्यात आले. प्रत्यक्षात त्याचा फायदा भाजपने उठवला व तरुणांच्या संघटना बाजूलाच पडल्या. नंतर तर त्या संघटनांची आंदोलने चिरडण्यापर्यंत भाजपची मजल गेली व आज देशातील कोणताही असंतोष मुळातूनच उखडून टाकण्याची व्यवस्था नरेंद्र मोदी सरकारने केली आहे. बांगलादेशात याचीच पहिली पायरी घडली आहे. मात्र बीएनपीने तरुणांचे श्रेय मान्य करून त्यांना व्यवस्थेत पुरेसे सामावून घ्यायला हवे व त्यांचा असंतोषही ऐकायला हवा. अन्यथा, आणखी पाच वर्षांनी तो देश अधिक भयंकराच्या वाटेने जाऊ शकेल. मुस्लिम धर्मांधता वाढीला लागल्याचे पुरेसे पुरावे तिथे मिळाले आहेतच. उद्या बीएनपीचे सरकार अपयशी झाले तर त्या पोकळीत शिरून बांगलादेश हा याच धर्मांधाच्या हातात जाण्याचा धोका आहे. भारतासाठी ते अधिक चिंताजनक असेल. पाकिस्तानच्या धर्मांध व दहशतवादी कृत्यांचा फटका आपण आजवर झेलला आहे. भविष्यात पाकिस्तान बांगलादेशाच्या आडून कारवाया करू लागला तर ते निस्तरणे आपल्याला कठीण जाईल. यास्तव बीएनपी सरकारशी चांगले संबंध ठेवणे, बांगलादेशाला शक्य तितकी मदत करणे आवश्यक आहे. अलिकडेच क्रिकेट विश्वचषकातील वादाच्या निमित्ताने, आयसीसीतील सत्तेचा दुरुपयोग करून भारताने बांगलादेशाला अतिशय अपमानास्पद वागणूक दिली. त्याला सांभाळून घेणे व विश्वचषक चांगल्या रीतीने पार पाडणे हे आपल्याला अधिक शोभून दिसले असते. पण मोदी व अमित शाह यांच्या डोक्यातील हिंदू-मुस्लिम द्वेष आडवा आला व शाह यांचे चिरंजीव असलेल्या जय शाह यांनी बांगलादेशाची कोंडी केली. यातून आपण आपल्या शेजारी अकारण एका भारतविरोधाला खतपाणी घातले. उद्या त्या संतापाचा व विरोधाचा भडका उडू शकतो व भारताला गैरसोयीचा ठरू शकतो. बड्या शक्तीदेखील याचा फायदा घेऊ शकतात. नुकताच अमेरिकी कराराचा जो तपशील बाहेर आला आहे त्यातून हे स्पष्ट होते. भारतीय कपड्यांवर अमेरिकेत १८ टक्के आयातशुल्क लागेल तर बांगलादेशाच्या कपड्यांना मात्र ते शून्य टक्के असू शकेल. अमेरिका वगैरेंचे असे संभाव्य डावपेच लक्षात घेता मोदींनी बांगलादेशाशी संबंध सुधारावे लागणे गरजेचे आहे.


---

विचार

# अमेरिका-'जमात'च्या हातमिळवणीचा धोका

***बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' या पक्षाशी संबंध सुधारण्यावर अमेरिका लक्ष केंद्रित करत आहे. फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये हा पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला येईल, असा अंदाज आहे. पाकिस्तानशी चांगले संबंध आणि बांगलादेश मुक्ती संग्रामाच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या 'जमात'शी अमेरिकेचे सुधारत चाललेले संबंध भारतासाठी पुढील काळात डोकेदुखी ठरु शकतात.***

प्रा.जयसिंग यादव



अमेरिकन प्रशासनाच्या अंदाजानुसार बांगलादेशमधील 'जमात-ए-इस्लामी' हा इस्लामिक पक्ष पुढील महिन्याच्या निवडणुकीत आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी करू शकेल आणि म्हणूनच अमेरिका त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेशमध्ये 'जमात-ए-इस्लामी' या संघटनेवर यापूर्वी अनेक वेळा बंदी घालण्यात आली होती. अलिकडेच शेख हसीना यांची राजवट आरक्षण आंदोलनाला लागलेल्या हिंसक वळणामुळे उलथवून टाकण्यात आली. तिथे युनूस मोहम्मद यांचे हंगामी सरकार सत्तेवर आहे. या सत्तेच्या काळात 'जमात-ए-इस्लामी'ला अधिक महत्त्व मिळत गेले. हसीना यांच्या सरकारकडे युनूस हे ही शत्रूपक्षाचे सरकार म्हणून पाहत होते. हे सरकार उलथवून टाकण्यात 'जमात-ए-इस्लामी'ची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे युनूस याच पक्षाच्या सल्ल्याने कारभार करतात आणि धोरणे ठरवतात. हाच पक्ष सत्तेवर यावा, असे त्यांना वाटते. 'जमात-ए-इस्लामी' पक्षाने पारंपारिकपणे शरिया कायद्यावर आधारित शासन आणि महिलांचे कामाचे तास कमी करण्याचा पुरस्कार केला आहे; जेणेकरून त्या मुलांप्रती त्यांची कर्तव्ये पार पाडू शकतील. तथापि, अलिकडेच त्यांनी आपली सार्वजनिक प्रतिमा सौम्य करण्याचा आणि महिलांचा पाठिंबा वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. 'जमात-ए-इस्लामी'चे प्रवक्ते मोहम्मद रहमान म्हणाले, की पक्ष भ्रष्टाचारविरोधी, पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन या मुद्यावर निवडणुका लढवत आहे. महिलांसाठी कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव प्राथमिक टप्प्यात आहे आणि पक्षाची शरिया कायदा लागू करण्याची कोणतीही योजना नाही.

१९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'च्या अनेक नेत्यांनी लोकांवर गंभीर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. पक्षाने वेगळ्या बांगलादेशला विरोध केला होता, कारण तो इस्लामविरोधी असल्याचे मानले जात होते. भारतात बाबरी मशीद पाडल्यानंतर, जमात नेते आणि विद्यार्थी संघटनांवर बांगलादेशमध्ये हिंदूविरोधी दंगली भडकवल्याचा आरोपही करण्यात आला होता. बांगलादेशमधील राजकीय परिस्थिती बदलत असताना तेथील अमेरिकन राजदूतांनी पुनरुज्जीवित इस्लामिक चळवळीसोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालानुसार अमेरिकेचा अंदाज आहे, की 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशच्या निवडणुकीमध्ये ऐतिहासिक यश मिळवू शकते. 'वॉशिंग्टन पोस्ट'ने मिळवलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार एक डिसेंबर रोजी बांगलादेशी महिला पत्रकारांसोबत बंद दाराआड झालेल्या बैठकीत ढाका येथे तैनात असलेल्या एका अमेरिकन राजदूताने सांगितले, की देश इस्लामिक झाला आहे आणि १२ फेब्रुवारीच्या निवडणुकीमध्ये 'जमात-ए-इस्लामी' पूर्वीपेक्षा चांगले प्रदर्शन करेल. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्रानुसार 'जमात-ए-इस्लामी' बांगलादेशवर इस्लामिक कायद्याची आपली धारणा लादण्याचा प्रयत्न करेल, या चिंतेकडे अमेरिकन राजदूताने दुर्लक्ष केले. ते म्हणाले, की जमात शरिया लादू शकते, असे मला वाटत नाही. पक्षाच्या नेत्यांनी अशी भयानक पावले उचलल्यास अमेरिका दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर शंभर टक्के कर लादेल.

'द वॉशिंग्टन पोस्ट'ला दिलेल्या निवेदनामध्ये ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या प्रवक्त्या मोनिका शिया म्हणाल्या, की डिसेंबरमध्ये झालेली चर्चा ही एक नियमित बैठक होती. ही अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पत्रकारांमधील 'ऑफ-द-रेकॉर्ड' चर्चा होती. त्या म्हणाल्या, की बैठकीदरम्यान अनेक राजकीय पक्षांबाबत चर्चा झाली. अमेरिका कोणत्याही एका राजकीय पक्षाला दुसऱ्यापेक्षा जास्त पसंती देत नाही आणि बांगलादेशमधील लोक निवडत असलेल्या सरकारसोबत काम करण्याची अमेरिकन सरकारची योजना आहे. तथापि, 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या अहवालात बांगलादेशमधील अमेरिकन राजदूत एका महत्त्वपूर्ण संक्रमणादरम्यान देशाच्या राजकीय भविष्याकडे कसे पाहतात, यावर प्रकाश टाकला आहे. ढाका येथील दूतावासाच्या बैठकीत, एका अमेरिकन अधिकाऱ्याने सूचित केले, की 'जमात-ए-इस्लामी'शी संपर्क साधण्याव्यतिरिक्त मिशनचे कर्मचारी 'हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेश' आणि 'इस्लामी आंदोलन बांगलादेश'सह इतर रूढीवादी गटांसोबतही काम करत आहेत. ते इस्लामिक राजकीय पक्षांमध्येही सामील होऊ शकतात. राजनयिकाने जोर देऊन सांगितले, की 'जमात-ए-इस्लामी' सत्तेत आली आणि अमेरिकेला मान्य नसलेली धोरणे लागू केली, तर अमेरिका बांगलादेशच्या मोठ्या कापड उद्योगावर काही बंधने घालू शकेल. अधिकाऱ्याने सांगितले, की बांगला देशच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग अमेरिकेवर अवलंबून आहे. त्यांनी बांगलादेशच्या कापड निर्यातीचा उल्लेख केला. यामुळे भारताची चिंता कमी होण्याची शक्यता नाही.

भारताने २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील 'जमात-ए-इस्लामी'च्या शाखेला बेकायदेशीर गट घोषित केले आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यावर बंदी घातली. १९७५ आणि १९९३ मध्ये येथे 'जमात-ए-इस्लामी' वर बंदी घालण्यात आली होती. 'जमात-ए-इस्लामी'चे अमेरिकन प्रवक्ते मोहम्मद रहमान यांनी एका निवेदनात म्हटले, की आम्ही एका खासगी राजनयिक बैठकीदरम्यान केलेल्या कथित टिप्पण्यांवर भाष्य करू इच्छित नाही. गेल्या काही महिन्यांमध्ये भारत-अमेरिका संबंध बिघडत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या स्थापनेपासून भारत आणि बांगलादेशमधील संबंध इतिहासातील सर्वात खालच्या टप्प्यावर पोहोचले आहेत.

'जमात-ए-इस्लामी'शी वाढू शकणारे अमेरिकेचे संबंध अमेरिका आणि भारत यांच्यात आणखी दरी निर्माण करू शकतात. भारताचा पाकिस्तानशी अलिकडेच झालेला संघर्ष, रशियन तेल खरेदी, अपूर्ण व्यापार करार आणि अनेक भारतीय उत्पादनांवर अमेरिकेचे शुल्क यामुळे भारत-अमेरिका संबंध आधीच वाईट स्थितीत आहेत. अनेक वर्षांपासून 'जमात-ए-इस्लामी' भारताचा सर्वात मोठा शत्रू आहे. भारत या पक्षाला पाकिस्तानचा मित्र मानतो आणि प्रादेशिक सुरक्षा धोरणासाठी धोका म्हणून पाहतो. अमेरिका-भारत संबंध चांगल्या स्थितीत असते, तर अमेरिका निवडणुकीपूर्वी 'जमात-ए-इस्लामी'बद्दलच्या भारतीय चिंतांकडे लक्ष देण्यास तयार झाली असती; परंतु आता ते शक्य नाही.

बांगलादेश हा राजकीय गोंधळातून जन्मलेला देश आहे. १९७१ मध्ये झालेल्या युद्धानंतर पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळाले, तेव्हापासून बांगलादेशने लष्करी उठाव, हुकूमशाही आणि प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेतृत्वाखाली अशांततेचा सामना केला आहे. भारत-बांगलादेश संबंध आधीच अनिश्चित स्थितीत आहेत. शेख हसीना भारताच्या जवळच्या मित्र मानल्या जात होत्या आणि त्यांना सत्तेवरून काढून टाकल्यापासून त्या भारतात रहात आहेत. नोव्हेंबरमध्ये बांगलादेशच्या एका न्यायाधिकरणाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. त्यांना किमान १,४०० निदर्शकांच्या हत्येसाठी जबाबदार ठरवले. बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या विनंतीला न जुमानता भारताने त्यांचे ढाका येथे प्रत्यार्पण केले नाही. डिसेंबरमध्ये झालेल्या बैठकीत एका अमेरिकन राजनयिकाने म्हटले होते, की हसीनाला दोषी ठरवणे राजकीयदृष्ट्या योग्य होते. अधिकाऱ्याने पुढे म्हटले, की न्यायाधिकरण 'स्वतंत्र आणि निष्पक्ष' नव्हते; परंतु हसीना दोषी आहेत. भारतावर 'जमात-ए-इस्लामी'चा राग आणि युनूस यांचीही तशीच भूमिका हे सारे पाहता अमेरिकेचे त्यांच्याशी वाढत चाललेले मैत्रीपूर्ण संबंध दक्षिण आशियातील राजनैतिक समीकरणांवर प्रतिकूल परिणाम घडवतील. अमेरिकेला शेख हसीना कधीच आवडत नव्हत्या. तसेच अमेरिकेला बांगलादेशमध्ये भारताचा प्रभाव मान्य नव्हता. हसीना यांच्यानंतरच्या सरकारच्या पहिल्या प्रमुख राजकीय निर्णयांपैकी एक म्हणजे 'जमात-ए-इस्लामी'वरील बंदी उठवणे. यावरून अमेरिका बांगलादेशमध्ये तिला अपेक्षित आहे, तेच घडवू पहात आहे हे लक्षात येते.

बांगला देशच्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान नरसंहार करणाऱ्या पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा देणाऱ्या 'जमात-ए-इस्लामी'चे हात रक्ताने माखले आहेत. ती बांगलादेशमधील धर्मनिरपेक्षता नष्ट करू इच्छितात आणि देशाला इस्लामी बनवू इच्छितात; परंतु गेल्या दीड वर्षात त्यांना पद्धतशीरपणे मुख्य प्रवाहात आणले गेले आहे. या पार्श्वभूमीवर 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या विश्लेषणाचा अर्थ लावला, तर बांगलादेश-अमेरिकेचे वाढते संबंध भारतासाठी अडचणीचे ठरु शकतात, हे लक्षात येईल.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# सण, उत्सवांत ध्वनी मर्यादा गरजेची

वैष्णवी वाडकर

भारत देश हा सण उत्सवांचा देश म्हणून ओळखला जातो. देशात वर्षभर एकामागोमाग एक सण समारंभ येत असतात आणि ते मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. इंग्रजी नववर्षातील पहिला सण मकरसंक्रांतीपासून दिवाळीपर्यंतचे सर्व सण गावागावात पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. गणेशोत्सव, नवरात्री, होळी आणि दिवाळी या सणांची जिल्ह्यात वेगळीच मज्जा असते. नाच गाण्यांशिवाय हे सण अपुरे वाटतात. विशेषतः गणेशोत्सव, नवरात्री आणि होळीमध्ये पारंपरिक गाणी व भजनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण या उत्सवांमध्ये सहभागी होतात. मंडळांची सजावट, आरत्या, सांस्कृतिक कार्यक्रम, ढोल-ताशे आणि पारंपरिक वेशभूषा यामुळे प्रत्येक सणला अधिक रंग चढतो. सण हे केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारे निमित्त आहे. या निमित्ताने नाती अधिक मजबूत होतात, मतभेद विसरले जातात आणि एकोप्याची भावना वाढते. त्यामुळे देशभरात सण समारंभ हे सामाजिक ऐक्य मजबूत करणारे माध्यम मानले जातात. मात्र, या आनंद सोहळ्यांबरोबर ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा पुढे येत आहे.



देशात सण साजरे करताना मोठ्या आवाजातील ध्वनीवर्धक व डीजे काही वेळा नागरिकांसाठी त्रासदायक ठरतात. त्याचा आरोग्यावर प्रचंड परिणाम होतो. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते सतत मोठ्या आवाजात राहिल्यास मायग्रेन, डोकेदुखी, ताण आणि रक्तदाब वाढण्याची शक्यता असते. आधीपासून हृदयविकार असलेल्या व्यक्तींना अशा आवाजामुळे अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे अनेकदा या ध्वनीवर्धकांचा त्रास होत असल्याने नागरिक पोलीस स्थानकात तक्रार दाखल करतात. सण समारंभाचा काळात मुलांची परीक्षा असेल तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो, रुणालय परिसरातील शांतता भंग होते, तसेच वृद्ध आणि लहान मुलांना त्रास मोठ्या आवाजातील ध्वनीवर्धकांच्या अधिक त्रास होत असल्याचे नेहमी बोलले जाते. त्यामुळे उत्सव साजरे करताना जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यात ध्वनिप्रदूषण वाढून न देता प्रशासनाच्या नियमांचे पालन करून सणांचा उत्साह व आवाजाची मर्यादा राखणे गरजेचे ठरत असल्याची चर्चा आहे.

याच पार्श्वभूमीवर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सुधारित नियमांनुसार २०२६ सालात निवडक १५ दिवस ध्वनीवर्धक आणि ध्वनीक्षेपक वापरण्यास मध्यरात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार शिवजयंती (१९ फेब्रुवारी), होळी पौर्णिमा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, ईद-ए-मिलाद, गणपती उत्सवातील दुसरा दिवस, गौरी विसर्जन, अनंत चतुर्दशी, साखरचौथ विसर्जन, नवरात्री उत्सव, दिवाळी लक्ष्मीपूजन, ख्रिसमस आणि ३१ डिसेंबर या दिवशी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीवर्धक आणि ध्वनीक्षेपक वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या आदेशानुसार ही परवानगी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. मात्र, राज्य शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रांमध्ये हा नियम लागू होणार नाही. वर्षभरातील ठराविक सणांच्या दिवशीच ही मुभा राहणार असून प्रशासनाने ध्वनीची मर्यादा पाळणे बंधनकारक असल्याचे सांगितले आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळमार्फत पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे परवानगी म्हणजे अमर्याद आवाज नव्हेतर मर्यादेत राहून आनंद साजरा करण्याची संधी आहे असे बोलले जात आहे. अनेकांचे मत आहे की, संगीताशिवाय सण अपूर्ण आहेत. भजन, आरत्या आणि लोकगीते लोकांना एकत्र आणतात. गुढीपाडवा, गणेशोत्सव तसेच लग्नसमारंभाच्या वेळी मिरवणूक काढण्याची आपली परंपरा आहे. ढोल-ताशे आणि डीजेच्या गाण्यांवर लोक या मिरवणुकीत आनंदाने ठेका धरतात. या गाण्यांच्या तालावर सणांचा आनंद अधिक वाढतो आणि वातावरण उत्साहाने भरून जाते. मात्र, हा आनंद साजरा करताना इतरांचाही विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करून सण साजरे केले तर आनंदही टिकेल आणि सर्वांना शांतताही मिळेल. शेवटी सणांचा खरा अर्थ म्हणजे एकत्र येणे, आणि सुखद आठवणी निर्माण करणे आणि आनंदी राहणे. मात्र, तोच आनंद कोणालाही त्रासदायक ठरू नये याची जबाबदारी नागरिकांची असून त्याचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे असल्याचे समाज सुधारकांकडून बोलले जात आहे.

---

लोकसंसद

## निवडणुकीआधीची अटक : योगायोग की साधलेली वेळ?

भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे माजी महापौर आणि नवनिर्वाचित नगरसेवक विलास पाटील यांना महापौरपदाच्या निवडणुकीच्या तोंडावर अटक करण्यात आल्याच्या वृत्ताने राजकीय वर्तुळात तसेच सामान्य नागरिकांत चर्चा सुरू झाली आहे म हापौरपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होण्याच्या तोंडावरच ही कारवाई झाल्याने संशयाची छाया अधिक गडद झाली आहे. सदर प्रकरणात गुन्हा काही वर्षांपूर्वी दाखल झाल्याचे वृत्तात नमूद आहे. मग इतका कालावधी लोटल्यानंतर अचानक अटकेची घाई का झाली? तपास यंत्रणांनी यापूर्वी ठोस पावले का उचलली नाहीत? निवडणूक जाहीर झाल्यावरच कारवाई करण्यामागे केवळ योगायोग आहे, असे म्हणणे कठीण जाते. कारण राजकारणात 'वेळ' हा सगळ्यात महत्त्वाचा घटक असतो. यापूर्वीही विविध स्तरांवर सत्ताधारी पक्षाच्या विरोधकांवर चौकशा, नोटिसा, अटक किंवा धाडी यांसारख्या कारवाया निवडणुकांच्या तोंडावर झाल्याची उदाहरणे राज्य आणि देशपातळीवर चर्चेत आली आहेत. ताज्या घटनेमुळे त्या संशयाला अधिक बळ मिळत असल्याचे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत, याबाबत दुमत नाही. जर आरोप खरे असतील तर कोणताही राजकीय पदाधिकारी कायद्याच्या चौकटीबाहेर राहू नये. निवडणूक प्रक्रियेच्या काळात अशा कारवाया झाल्यास त्यातून प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. लोकशाही व्यवस्थेत तपास यंत्रणांची स्वायत्तता आणि तटस्थता हीच जनतेचा विश्वास टिकवण्याची किल्ली आहे. या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रियेत सत्य बाहेर येईलच; परंतु सत्ताधाऱ्यांनीही पारदर्शकतेने आणि वेळेच्या संवेदनशीलतेची जाणीव ठेवून वागणे आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येक कारवाईकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाईल. **– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

दिनविशेष

# निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व; आर आर पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आम दार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला.राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ फेब्रुवारी

१)श्रीम. अलका अनंत पंडित
अलिबाग, १६-२-१९३९
२) श्रीम. नलिनी दत्तात्रेय चव्हाण
अलिबाग, १६-२-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५

**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**लायन्स क्लब ऑफ अलिबाग डायमंड**

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण

## ● अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे नागरिक हैराण; परिवहन सेवेत वाढ करण्याची मागणी

**। पालघर । प्रतिनिधी ।**

शहरातील वाढती लोकसंख्या, रस्त्यांवरील वाहनांची वाढ आणि अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे वसई विरारमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत आहे. बसगाड्यांची संख्या आणि फेऱ्या वाढवून परिवहन सेवा सक्षम करण्यासाठी येत्या अर्थसंकल्पात मोठी तरतूद करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. वसई विरार महानगरपालिकेचा परिवहन विभाग दरवर्षी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करतो. हा अर्थसंकल्प साधारणपणे ७० ते ८० कोटी रुपयांच्या घरात असतो. मागील काही वर्षात परिवहन भवन उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवण्यात आला होता. आता भवन उभारणी पूर्ण झाल्याने निधी थेट सेवा विस्तार आणि बसखरेदीकडे वळवण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सध्या महापालिकेकडे सुमारे १२० बसगाड्या उपलब्ध असून त्यापैकी सुमारे ११० बस रस्त्यावर धावत आहेत. शहरातील ३८ मार्गांवर बससेवा दिली जाते. मात्र नालासोपारा, नायगाव, वसई आणि विरार या भागात बसफेऱ्या अपुऱ्या असल्याची तक्रार वारंवार पुढे येते. परिणामी नागरिकांना रिक्षा किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे वाहतूककोंडी वाढत आहे.

महापालिकेतर्फे महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, कर्करोग रुग्ण, डायलिसिस करणारे रुग्ण आणि शालेय विद्यार्थ्यांना मोफत बसपास दिला जातो. या योजनेसाठी दरवर्षी सुमारे २० ते २२ कोटी रुपयांचा खर्च होतो. समाजिकदृष्ट्या महत्वाची ही योजना असली तरी महसुलावर त्याचा मोठा परिणाम होत आहे.

दरम्यान केंद्र सरकारच्या 'नॅशनल क्लीन एअर' कार्यक्रमांतर्गत काही बसगाड्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. तसेच १८ सीएनजी बसगाड्या आधीपासून कार्यरत आहेत. यंदा पंतप्रधान योजनेंतर्गरत १०० नव्या ई-बसगाड्या शहरात दाखल होणार आहेत. या प्रकल्पासाठी एकूण ३७ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून त्यातील २७ कोटी रुपये शासनाकडून मिळाले आहेत. उर्वरित १० कोटींसाठी महापालिकेला स्वत:च्या अर्थसंकल्पातून तरतूद करावी लागणार आहे.

### प्रभावी नियोजन आवश्यक

**या ई-बसगाड्यांसाठी वसईतील नवघर येथे आणि नालासोपारा पश्चिमेला बस डेपो उभारण्याचे काम सुरू आहे. नव्या बस दाखल झाल्यानंतर मार्गसंख्या आणि फेऱ्या वाढवण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येते. मात्र यासाठी प्रभावी नियोजन आणि आर्थिक शिस्त आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.**

### वाहतूककोंडीतून दिलासा मिळेल

**परिवहन सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी, बसगाड्यांची संख्या वाढवण्यासाठी आणि फेऱ्या नियमित करण्यासाठी येत्या अर्थसंकल्पात ठोस आणि भरीव तरतूद करावी, अशी अपेक्षा वसई विरारकर व्यक्त करत आहेत. सार्वजनिक वाहतूक सक्षम झाल्यास वाहतूककोंडी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, अशी सर्वसामान्यांची भावना आहे.**

# कोट्यवधींचा ऐवज मूळ मालकांना परत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

परिमंडळ-१० अंतर्गत येणाऱ्या पोलिसांनी चोरीला तसेच हरविलेल्या तब्बल ४९० तक्रारदारांचा किमती ऐवज परत मिळवून त्यांना परत देण्यात आला. दोन कोटी ९१ लाख रुपये किंमतीचा ऐवज पोलिसांनी मूळ मालकांना परत देण्याची कामगिरी पार पाडली. परिमंडळ-१० अंतर्गत येणाऱ्या मेघवाडी, जोगेश्वरी, अंधेरी, पवई, एमआयडीसी, साकीनाका या पोलीस ठाण्यांमध्ये चोरी, फसवणूक, हरविले, सायबर फसवणुकीतून नुकसान झाल्याच्या



अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या पोलीस ठाण्याच्या पथकांनी कसून शोध घेत मौल्यवान वस्तू व दागिने, रोकड, दुचाकी, तीनचाकी, चारचाकी, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक साहित्य असा तब्बल दोन कोटी ९१ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल शोधून मूळ मालकांना परत केला.

# अकरा कोटींचा एमडी साठा जप्त

## ● मुंबई गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट-९ ने ड्रग्जविरोधात मोठी कारवाई केली. दिल्ली ते पुणे व्हाया मुंबई असा बसने प्रवास करणाऱ्या एका ड्रग्ज माफियाला विलेपार्ले येथून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट-९ ने केली असून आरोपीकडून कोकेन व एमडीचा तब्बल ११ कोटी २८ लाख रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.

अक्षयी कांदियली (२१, मुळचा केरळ) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. तो दिल्ली ते पुणे असा बस प्रवास करत असून ती बस मुंबईमार्गे जाणार असल्याची खबर युनिट-९ ला मिळाली.



त्यानुसार प्रभारी निरीक्षक सचिन पुराणिक यांच्या नेतृत्वाखाली सपोनि उत्कर्ष वझे, उपनिरीक्षक सुजित म्हैसधुणे तसेच सुनील म्हाळसंग, बाबा शेळके, राकेश कदम, मिलिंद परब या पथकाने त्या बसचा माग काढण्यास सुरुवात केली. बस विलेपार्ले येथे थांबणार असल्याची माहिती मिळताच पथकाने त्या ठिकाणी सापळा लावला. दिल्लीहून पुण्याला निघालेली ती बस विलेपार्ले येथे येताच पथकाने बसमधून प्रवास करणाऱ्या त्या ड्रग्ज तस्कराला पकडले. त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळल सात कोटी सहा लाख रुपये किंमतीचे ३.५३०किलो वजनाचे मेफेड्रिन आणि २.४२२ किलो वजनाचे व चार कोटी २२ लाख रुपये किंमतीचे कोकेन असा तब्बल ११ कोटी २८ लाख रुपये किंमतीचा ड्रग्जचा साठा जप्त केला. याप्रकरणी विलेपार्ले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी देण्यात आली.

## कांदळवन स्वच्छता, जनजागृती मोहीम

**पनवेल :** कांदळवन विभाग, दक्षिण कोकण यांच्या वतीने पनवेल परिमंडळांतर्गत कलावरी जेट्टी, गव्हाण (उलवे जवळ) येथे कांदळवन स्वच्छता अभियान व जनजागृती मोहीम उत्साहात पार पडली. सकाळी ८ वाजता या उपक्रमाला सुरूवात झाली. या मोहिमेदरम्यान किनारपट्टी परिसरातील प्लास्टिक व इतर कचरा संकलित करण्यात आला. नागरिकांना कांदळवनांचे पर्यावरणीय महत्त्व, जैवविविधता संवर्धन आणि सागरी किनारपट्टी रक्षणातील भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, कांदळवन ही नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण देणारी भिंत असून त्यांचे जतन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. अशा प्रकारच्या मोहिमा सातत्याने राबवून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. उलवे जवळील या उपक्रमात कांदळवन खात्याचे अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच म्हात्रे शाळेतील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना कांदळवनांचे पर्यावरणीय महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि नाश टाळण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. परिसरातील प्लास्टिक व इतर कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली. वनखात्याकडून येथे भविष्यात इको-टुरिझम विकसित करण्याचा प्रस्ताव असून, कांदळवनातील विविध प्रजाती, त्यावर अवलंबून असलेली जैवविविधता आणि पाणथळ भागातील पक्षीनिरीक्षणासाठी विशेष सुविधा उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमात रघुनाथ जाधव, ज्योती नाडकर्णी, रंजना सडोलीकर यांचा सहभाग लाभला. तसेच कांदळवन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी कुलदीप पाटकर यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली.

# विद्यार्थ्यांनी सैन्यामध्ये सहभागी व्हावे

## निवृत जवान कुमार जाधव यांचे आवाहन

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथे असलेल्या शार्विल स्कूल ऑफ एक्सलन्स या संस्थेच्या सिबिएससी स्कूलमधील विद्यार्थ्यांना कमांडो ट्रेनिंग दिले जाते. ही कमांडो प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी पालक वर्गासमोर सादर केली. दरम्यान यावेळी नेरळ गावातील निवृत्त थळ सैनिक कुमार जाधव यांनी शार्विलमधील विद्यार्थ्यांनी सैन्यामध्ये सहभागी होण्यासाठी आपले उद्दिष्ट निश्चित करावे, असे आवाहन केले.

नेरळ-कर्जत रस्त्यावरील खोत सेलिब्रेशन मैदान येथे कमांडो प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला दीप प्रज्वलन प्रसंगी प्रमुख पाहुणे संतोष पेरणे, अमोल जाधव तसेच शर्विल स्कूल ऑफ एक्सलन्स या संस्थेचे अध्यक्ष मुजाहिद खोत यांचे हस्ते झाले. यावेळी संस्थेचे विश्वस्त अब्दुल रौफ खोत, आत्माराम खंडागळे, उज्ज्वला पाटील, अकॅडमीक प्रमुख सुशीला अनंथरमन, सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका मीना कुमार आणि मोईज खोत आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी निवृत जवान कुमार जाधव यांनी देशाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही क्षेत्रात विद्यार्थ्यांनी आपले करिअर शोधावे, असे आवाहन केले. त्यात मिल्ट्रीमधील थळ सेना, वायू सेना, जल सेना तसेच पोलीस अशा कोणत्याही सेवा दलात सहभागी होण्यासाठी प्राथमिक स्वरूपात महत्वाची असलेली ट्रेनिंग या ठिकाणी शर्विलमध्ये मिळत आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यासाठी उपयोगात आणण्याचे आवाहन केले. तर आपल्या १५ वर्षाच्या सेवेतील काही घटनांचे अनुभव यावेळी सांगत सर्वांच्या मनात देशाच्या सेवेबद्दल आदरभाव निर्माण व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. शार्विल स्कूलमध्ये गेली दोन वर्षे कमांडो ट्रेनिंग अकॅडमी चालविली जात आहे. या ट्रेनिंगचे प्रमुख सचिन कुमार यांनी आपल्याकडून देण्यात आलेल्या ट्रेनिंगनंतर प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी पालकांसमोर सादर केले.

# व्यावसायिकाची लाखोंची फसवणूक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

तीन महिन्यात मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत व्यावसायिकाची लाखोंची फसवणूक करण्यात आली. हा धक्कादायक प्रकार मुंबईच्या भायखळ्यामधून उघडकीस आला आहे. याप्रकरणी झाकिरुद्दीन सय्यद आणि त्यांचे दोन मुलगे शाहबाज सय्यद आणि जबिल सय्यद यांच्याविरुद्ध जेजे मार्ग पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिलेल्या तक्रारीनुसार, अनिस खान हे जहाज बांधणीचा व्यवसाय करतात. अनिस खान सांना मोठी रक्कम गुंतवल्यास तीन महिन्यांत लाखोंचा नफा मिळेल असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर अनिस खान यांनी त्यांना 'व्यवसाय कर्ज'च्या नावाखाली ४१ लाख रुपये दिले. मात्र सय्यद कुटुंबाने त्यांची फसवणूक केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

आरोपींनी ४१ लाख रुपयांच्या बदल्यात २० लाख रुपयांचा अतिरिक्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. मात्र कालावधीनंतर, मूळ रक्कम किंवा नफा परत मिळाला नाही. खान यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलीस सूत्रांचे म्हणणे आहे की, झाकिरुद्दीन सय्यद यांच्याविरुद्ध यापूर्वीही फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# कोकणातील कातळशिल्पांचे गूढ उलगडणार

## संशोधनासाठी सरकारकडून १४.६२ कोटी मंजूर

**। मुंबई प्रतिनिधी ।**

कोकणातील प्राचीन कातळशिल्पांचे शास्त्रोक्त संशोधन आणि जागतिक वारसा नामांकन प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'जागतिक वारसा कक्ष' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी १४ कोटी ६२ लाख ३२ हजार



६७१ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने कोकणातील कातळशिल्पांचा प्रस्ताव युनेस्कोकडे यापूर्वीच सादर केला आहे. त्या प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य शासनाने २०२६ ते २०२९ या कालावधीत कार्यरत राहणारा 'जागतिक वारसा कक्ष' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या कक्षाच्या दोन शाखा मुंबई आणि रत्नागिरी येथे असणार आहेत.

रत्नागिरी शाखा क्षेत्रीय कामकाज आणि जनसहभागावर लक्ष केंद्रित करणार आहे. कातळशिल्पांचे प्रत्यक्ष स्थळी जाऊन शास्त्रोक्त सर्वेक्षण, जागतिक स्थान निर्देशांक प्रणालीवर आधारित नकाशांकन, मानवविरहित उड्डाण यंत्राद्वारे छायाचित्रण व दृकश्राव्य दस्तऐवजीकरण ही कामे या शाखेतर्फे केली जाणार आहेत.

नैसर्गिक क्षरण किंवा मानवी हस्तक्षेपामुळे होणाऱ्या नुकसानीचे मूल्यमापन करून संवर्धनासाठी आवश्यक शिफारशी देण्याची जबाबदारीही या शाखेकडे असेल. तर मुंबई शाखा संशोधन आणि समन्वयाची जबाबदारी सांभाळणार आहे. भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कातळशिल्पांवरील उपलब्ध साहित्याचा सखोल अभ्यास, ऐतिहासिक नकाशे व उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने तांत्रिक विश्लेषण आणि कातळशिल्पांचा अद्ययावत माहितीकोश तयार करणे ही प्रमुख कामे असतील.

**राज्य सरकारकडून १६५ कोटींची तरतूद** | **शिक्षण क्रांतीचे एक नवे पाऊल**

# सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्यातील सरकारी शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार आहे. राज्य सरकारने या योजनेला प्रशासकीय मान्यता दिली असून, यासाठी १६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत ही दप्तरे पुरवण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे.



शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १३ फेब्रुवारी रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायदा २००९ तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक उपक्रमातंर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेतंर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये दप्तर पुरवण्यात येईल. इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षापासून मोफत दप्तर देण्यात येईल. राज्यातील ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. शिक्षण संचलकांनी हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे. या प्रस्तावानुसार, १६५ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे.

### नवीन शैक्षणिक वर्षापासून उपक्रम सुरू

ज्या महानगरपालिकांमध्ये अगोदरच ही योजना राबवली जाते अथवा विद्यार्थ्यांना त्यासाठी निधी दिला जातो. त्या शाळांमध्ये या योजनेचा लाभ देण्यात येणार नाही. पण इतर सरकारी शाळांमध्ये या योजनेतंर्गत मोफत दप्तर देण्यात येणार आहे. या योजनेत चांगली दप्तर मिळावीत अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त केली जात आहे. हलक्या दर्जाची अथवा बाजारगाळे दप्तरांचा पुरवठा करण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात येत आहे. नवीन शैक्षणिक वर्षापासून हा उपक्रम सुरू होण्याची शक्यता आहे.

### शैक्षणिक खर्चाचा भार झाला नगण्य

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन आणि आता मोफत दप्तरही देण्यात येणार आहे. त्यामुळे पालकांवरील शैक्षणिक खर्चाचा भार नगण्य झाला आहे. तरीही महापालिका आणि काही सरकारी शाळांमधील हजेरीपट कमीच दिसत आहे. त्यामुळे शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता आणि शाळा बंद होऊ नये, यासाठीही प्रयत्न करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# निवडक



## अवैध लाकूड साठ्यावर कारवाई

**रत्नागिरी :** संगमेश्वर तालुक्यात बुरंबी ते कोसुम्ब रेवाळेवाडी रस्त्यावर बेसुमार विनापरवाना जंगलतोड सुरु असल्याचे पर्यावरणप्रेमी मंडळीना दिसून आले होते. याबाबत त्यांनी थेट वनविभाग आणि वृत्तपत्रांकडे याबाबतचे पुरावे सादर केले होते. याची दखल घेऊन देवरुखचे वनपाल सागर गोसावी यांनी या बेकायदेशीर आणि विनापरवाना रस्त्या कडेला असलेला लाकूड साठा जप्त करुन कारवाई केल्याची माहिती परीक्षेत्र वनाधिकारी सुतार यांनी दिली. हा बेकायदेशीर लाकूड साठा कानाल नामक व्यक्तीचा असून तो एकूण पाच ट्रक एवढा होता. सध्याच्या दराने त्याचे बाजार मूल्य एक लाख ९६ हजार एवढे होत असल्याचे वनविभागाच्या वतीने सांगण्यात आले. अशा प्रकारचे जळाऊ लाकडाचे साठे नायरीच्या खोऱ्यासह, धामणी, कुचांबे, धामापूर आदि भागात असल्याचे पुरावे छायाचित्र आणि चित्रफितीसह वनविभागाकडे सादर केले जाणार आहेत. याबरोबरच वन विभागानेदेखील असे बेकायदेशीर लाकूड साठे ताब्यात घेण्यासाठी आपली गस्त वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गावागावात अशा प्रकारचे बेकायदेशीर जळाऊ लाकडाचे साठे आढळून आले आणि पर्यावरणप्रेमी तसेच ग्रामस्थांची तक्रार आल्यास वनविभाग नक्कीच कठोर कारवाई करेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



## भिवंडीत बेकायदा रेती उत्खनन

**ठाणे :** भिवंडीतील खाडीमध्ये बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन सुरू असल्याचे समजताच विशेष पथकाने धाव घेऊन छापा टाकला. या कारवाईत १ हजार ५२३ ब्रास रेतीसाठा जप्त केला असून पोकलेन मशीन व डंपरही ताब्यात घेतला आहे. दरम्यान, या कारवाईमुळे रेतीमाफियांचे धाबे दणाणले आहेत. काल्हेर येथील खाडीमध्ये चोरीछुपके रेतीचे उत्खनन सुरू असल्याची बाब निदर्शनास आली. त्याची गंभीर दखल ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी घेऊन त्वरित कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजात खोले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल खात्याने काल्हेरच्या खाडीकिनारी धाड टाकली असता तेथे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे उत्खनन केलेला रेतीसाठा आढळून आला. तसेच वाहतूक करणारा डंपर व पोकलेन मशीनदेखील तिथे होते. रेतीसह अन्य साहित्य जप्त केले असून संबंधितांवर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान यापुढे बेकायदा रेती उत्खनन होऊ नये, म्हणून माफियांवर करडी नजर ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## पर्यटक मायलेकाची आत्महत्या

**सिंधुदुर्ग :** देवगड तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यालगतच्या एका होमस्टेमध्ये पर्यटनासाठी आलेल्या गोव्यातील मायलेकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. १३ फेब्रुवारीच्या रात्री ते १४ फेब्रुवारी दुपारी १२.३० च्या दरम्यान ही घटना घडली. होमस्टेच्या मालकांनी देवगड पोलीस स्थानकात याबाबत फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोवा येथील पर्यटक देवगड तालुक्यातील समुद्रकिनारी पर्यटनासाठी शुक्रवारी १३ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता वास्तव्यासाठी आले होते. दुसऱ्या दिवशी देवदर्शन करून १४ फेब्रुवारी रोजी ८.३० वाजताच्या सुमारास पुढील प्रवासासाठी निघणार होते. दरम्यान होमस्टेचा चेक आउट टाइमिंग होऊन देखील पर्यटक बाहेर येत नसल्यामुळे होमस्टेच्या मालकांच्या पत्नीने खिडकीवरील पडदा बाजूला करून आत डोकावून पाहिले असता आई व मुलाने नायलॉनच्या दोरीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्येच्या केल्याच्या स्थितीत आढळून आले. मृत महिला शारदा कृष्णा गावडे (६४) आणि मुलगा सुदेश कृष्णा गावडे (३५) रा. गोवा असे त्यांची नावे असून देवगड पोलिसांनी मृतांच्या नातेवाईकांशी संपर्क साधला असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा अधिक तपास देवगड पोलीस करत आहेत.



## मटन-चिकनच्या दुकानावर कारवाई

**पनवेल :** सेक्टर १७ मधील जय गुरुदेव कॉम्प्लेक्ससमोर गेल्या अनेक वर्षांपासून अनधिकृतपणे सुरू असलेल्या मटन-चिकनच्या दुकानावर पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने तात्काळ कारवाई केली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार अवघ्या दोन तासांत ही कारवाई करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, संबंधित दुकान गेली सुमारे आठ वर्षे बिनपरवानगी सुरू होते. उघड्यावर कोंबड्या व बकऱ्या कापल्या जात असल्याने दुर्गंधीचा त्रास सोसायट्यांपर्यंत पोहोचत होता. अनेकवेळा तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांत होती. कारवाईचा प्रयत्न झाला की संबंधित व्यावसायिक स्थानिक राजकीय पुढाऱ्यांची नावे पुढे करून दबाव टाकत असल्याचा आरोपही रहिवाशांनी केला आहे. सोसायटीतील काही सदस्यांनी याबाबतची माहिती आणि छायाचित्रे थेट मनपाकडे पाठवली. त्यानंतर अतिक्रमण विभागाने तातडीने पथक पाठवून संबंधित अनधिकृत स्टॉल हटवला. दोन तासांच्या आत कारवाई होणे ही पहिलीच घटना असून प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली, असे नागरिकांनी सांगितले. या कारवाईबद्दल सोसायटीतर्फे पनवेल महानगरपालिकेचे आभार मानण्यात आले असून, कामोठे परिसरातील इतर ठिकाणच्या अतिक्रमणांवरही अशीच कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

## निवडक



### विद्यार्थ्यांनी घेतले प्रतापगडाचे दर्शन

**पाली** : आपटवणे शाळेतील मुलांना मोफत प्रतापगड दर्शन व चवदार तळे पाहण्यासाठी घेऊन जाणार असल्याचे आपटवणे गावातील यश ट्रॅव्हलचे मालक ज्ञानेश्वर एकनाथ दंत यांनी शाळेचे मुख्याध्यापक गणेश म्हात्रे यांना सांगितले होते. त्याप्रमाणे ज्ञानेश्वर दंत यांनी सर्व विद्यार्थी, शाळेतील शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्यांना घेऊन प्रतापगड दर्शन घडविले. यामुळे विद्यार्थी अतिशय आनंदित होते. या सहलीत विद्यार्थ्यांनी खुप मजा केली. विद्यार्थ्यांच्या हृदयात ही सहल दिवस कायम लक्षात राहील. मुलांना फ्रुटी, बिस्कीट, केळी, दुपारचे जेवण देण्यात आले. या सहलीला व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. अध्यक्ष नेहा ढिसे, उपाध्यक्ष मयुरी दंत, सदस्य विशाल उतेकर,चंद्रकांत बरतोड, प्रकाश राठोड, संगीता लेंडे, ललिता लेंडे, सारिका वाघमारे, पांडुरंग निरगुडा उपस्थित होते. शाळेच्या विषय शिक्षिका सीमा वैद्य यांनी ज्ञानेश्वर दंतांचे व सर्व व्यवस्थापन समितीच्या सदस्याचे आभार मानले.

### काजूगर विक्रीतून उदरनिर्वाह

**तळा** : तळा बाजारपेठेत ओले काजूगर विक्रीसाठी दाखल झाले असून जवळपास २०० ते २५० रुपयांपर्यंत शेकडा भावाने या कजुगरांची विक्री करण्यात येत आहे. तालुक्यातील आदिवासी



समाज हा जंगलातील रानमेवा विकून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवितो. फेब्रुवारी ते मे महिन्याच्या अखेरीस पर्यंत तालुक्यातील आदिवासी बांधव काजूगर, आंबे, फणस, करवंद, जांभूळ आदी रानमेवा विकून मिळालेल्या पैशांवर आपला उदरनिर्वाह करतात. तळा बाजारपेठेत सध्या काजूगरला मोठी मागणी असून यावर्षी ग्राहक २०० ते २५० रु. शेकड्याने काजूगर खरेदी करताना दिसत आहेत. आदिवासी बांधव दिवसभर उंच काटीच्या (आकोटी) सहाय्याने जंगलात ओल्या बिया काढून सायंकाळी घरी घेऊन येतात. दोन दिवस बियांची साठवणूक केल्यावर या बियांमधून अखंड गर काढण्यासाठी मोठी मेहनत घेतात. त्यानंतर या बिया बाजारात विक्रीसाठी आणल्या जातात. तळा बाजारपेठेत या ओल्या काजुगरांना मोठी मागणी असल्याने अवघ्या काही तासातच या बिया विकल्या जातात. हे काजूगर जवळपास पाऊस सुरू होईपर्यंत मिळत असल्याने गोरगरीब आदिवासी बांधवांच्या हाताला काम व पोटाची खळगी भरण्यास आधार मिळतो.



### बोरगाव शाळेत महाआरोग्य तपासणी

**पाताळगंगा** : वावर्ले केंद्रातील असलेली आदर्श शाळा बोरगाव येथे श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. समाजातील अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. अशा थोर संतांच्या जयंतीनिमित्ताने हरि ओम चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व इंडियन मेडिकल असोसिएशन, मुंबई (वेस्टर्न ब्रांच) यांच्या संयुक्त विद्यमाने ६५ शाळेमधील हजारो विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आदर्श शाळा बोरगाव येथील दरवर्षी उन्हाळा सरू होण्याच्या अगोदरच ही आरोग्य तपासणी करण्यात येते. यावेळी नेत्र तपासणी, कान, नाक, जीभ, त्वचा तसेच दंत चिकित्सा करण्यात आले. तसेच या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांस खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सतीश भाई काजी, अ. झि. ठाकूर गुरूजी, शिक्षक सेना अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, स्वागत शाम पवार यांनी केले. संजय चव्हाण यांनी सेवालाल महाराजांच्या कार्याची महती विद्यार्थ्यांस सांगितले. महेश म्हात्रे, दिपक ठाकूर, बाळू भालसिंग, संदीप काईनकर, भिकू पटेकर, सतीश सोनवळे, अनघा शिंदे,सुनिता ठोंबरे, भंडारकर, शितल पाटील आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मुख्याध्यापक उद्धव राठोड यांनी मानले.

### टेम्पोच्या धडकेत महिला जखमी

पनवेल : भरधाव टेम्पोच्या धडकेने एक महिला जखमी झाली. ही घटना पनवेल जवळील तुरमाळा फाटा परिसरात घडली आहे. भरधाव वेगाने जाणारा टाटा पिकअप टेम्पो (क्र.एमएच-४६-सीएल-८३४७) वरील चालक रमेश यादव याने त्याच्या ताब्यातील टेम्पो हयगयीने व अविचाराने चालवून रस्ता ओलांडीत असणाऱ्या ताराबाई घरत (७०) यांना धडक दिली. यात त्या जखमी झाल्या आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

• कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे- १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे १) उरण-उलवा २) पेण पोयनाड ३) माणगाव-महाड-बिरवाडी, पोलादपूर, कर्जत/खोपोली, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरुड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर (मुलगी) पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. संपर्क- ८८८८२२०२२१.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बसेसअभावी विद्यार्थ्यांची गैरसोय

## रसायनीहून सकाळची एनएमएमटी सेवा सुरू करण्याची मागणी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सध्या एनएमएमटी बससेवेच्या अनियमिततेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सकाळच्या वेळेत येणाऱ्या बसेस विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या बससेवा अचानक बंद करण्यात आल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

रसायनी परिसरातील अनेक विद्यार्थी दररोज महाविद्यालयात जाण्यासाठी एनएमएमटी बससेवेचा वापर करतात. सकाळच्या वेळेत येणाऱ्या बसेस त्यांना महाविद्यालयात वेळेवर पोहोचण्यासाठी सोयीची होत्या. मात्र, या बसेस अचानक बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. सध्या सकाळी ७:४५ वाजता पहिली बस येते आणि त्यानंतर थेट ९:१५ वाजता पुढील बस जाण्यासाठी उपलब्ध होते.



यामुळे विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे.

सकाळी ७:४५ ची बस विद्यार्थ्यांसाठी खूप लवकर होते, ज्यामुळे अनेकांना ती पकडणे शक्य होत नाही. तर ९:१५ ची बस उशिरा येत असल्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयात वेळेवर पोहोचू शकत नाहीत. परिणामी,

त्यांची महत्त्वाची लेक्चर्स बुडत आहेत आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर होत आहे.

### अभ्यासावर परिणाम

एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने या समस्येबद्दल बोलताना सांगितले की, ही केवळ माझी एकट्याची समस्या नसून, रसायनी परिसरातील अनेक विद्यार्थी आणि इतर प्रवाशांना याचा फटका बसत आहे. सकाळी ८:१५ ची बस बंद झाल्यामुळे आमची खूप गैरसोय झाली आहे आणि याचा आमच्या अभ्यासावर परिणाम होत आहे.

सकाळच्या वेळेत येणारी बस अचानक बंद झाल्यामुळे अनेक पालकांना आपल्या विद्यार्थ्यांना दुचाकीवरून शाळा तसेच महाविद्यालयापर्यंत नेऊन पोहोचिवण्याचे काम करावे लागते. मात्र अनेक लोकांच्या घरी वाहन नसल्याने काही विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तर काही विद्यार्थ्यांना अन्य प्रवासी वाहनांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे एनएमएमटी प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सकाळी ८:१५ वाजताची बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी रसायनी परिसरातील विद्यार्थी आणि पालकांनी केली आहे. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पालिकेतील सहा लिपिक बडतर्फ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेत पूर्वाश्रमीच्या ग्रापंचायतीमधील ३२४ कर्मचाऱ्यांचा तीन वर्षापूर्वी महापालिकेत समावेश करण्यात आला होता. यावेळी कर्मचाऱ्यांना तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. याबाबत वारंवार सांगूनही सहा लिपिकांनी तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्याने महापालिकेच्या आस्थापना विभागामार्फत या लिपिकांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

महापालिकेत समाविष्ट ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ भरतीसाठी लढा द्यावा लागला होता. स्थानिक पातळीपासून मंत्रालयापर्यंत हे कर्मचारी लढले. मात्र, सहा कर्मचाऱ्यांना किरकोळ बाबींची पूर्तता करता आली नाही. इंग्रजी, मराठी टायपिंग, एमएससीआयटी प्रमाणपत्र हे कर्मचारी सादर करू न शकल्याने आज घरी बसण्याची वेळ आली आहे. वारंवार सांगून, पत्रव्यवहार करूनही या कर्मचाऱ्यांनी तांत्रिक बाबींची पूर्तता न केल्याने ही कारवाई करण्यात आल्याची माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली. सुरेश चंदन, दर्शना म्हात्रे, शिवाजी चिपलेकर, योगेश केणी, आकाश पाटील आणि अक्षय म्हात्रे अशी सहा लिपिकांची नावे आहेत. बडतर्फ केलेल्या या कर्मचाऱ्यांना न्यायालयामार्फत मुदतवाढ घेऊन या लिपिकांना तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागणार आहे.



अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर फेसाळलेल्या लाटांमध्ये उभे राहून फोटो काढणारे आणि उंटावर सवारी करून व्हॅलेंटाईन साजरा करणारे प्रेमी युगुल.
(छायाचित्र : समीर मालोदे)

## महाविद्यालयात वीर वाजेकर पुण्यतिथी साजरी

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे येथे 'वीर वाजेकर पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने स्वीकारलेली आव्हाने, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील उपक्रम तसेच महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाची सविस्तर माहिती दिली. शाळा-जोडणी उपक्रमात महाविद्यालय आघाडीवर असल्याचेही त्यांनी नमूद केले.



मा. पी. जे. पाटील, संस्थापकीय चेअरमन, वीर वाजेकर कॉलेज व उपाध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी आपल्या मनोगतातून रयत शिक्षण संस्था आणि वीर वाजेकर यांच्या कार्यातील अनुभव सांगितले. वाय. जे. कडू, कमलाकर ठाकूर, अ. ना. ठाकूर, कृष्णा कडू, काका कडू, सहदेव मोकल, दत्तू धर्मा पाटील आदींच्या योगदानाची त्यांनी आठवण करून दिली. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणत ज्ञान, कौशल्य व तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. बाळाराम पाटील, चेअरमन, रायगड विभाग, सल्लागार समिती, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी वीर वाजेकर साहेबांच्या कार्याचा गौरव केला. कर्मवीरांनी रुजविलेली मानवीमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

संशोधन व पुस्तक लेखन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १३ प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रा. देवेंद्र कांबळे यांनी क्रीडा तर डॉ. सुजाता पाटील यांनी सांस्कृतिक विभागाचा अहवाल वाचन केला. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रीडा, कला व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला.

रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास डीप फ्रीज भेट दिला. तर प्राणिशास्त्राच्या माजी विद्यार्थ्यांनी एक फ्रिज, तीन पंखे व ४० भिंतीवरील घड्याळे भेट म्हणून प्रदान केली.

## काव्यरंग कार्यक्रमाच्या बॅनरचे प्रकाशन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या श्रीवर्धन नगरीत आई सोमजाई माता यांच्या पवित्र चरणी नतमस्तक होत शनिवारी (दि.१४) काव्यरंग शब्द नी:शब्द तुझाच आहे' या बहुप्रतिक्षित आणि आशयघन कार्यक्रमाच्या बॅनरचे विधिवत प्रकाशन करण्यात आले. अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा शुभारंभ सोहळा पार पडला.

याप्रसंगी आयोजक जितेंद्र नटे सांगितले की, काव्य, साहित्य आणि सादरीकरण यांचा अनोखा संगम असलेला हा कार्यक्रम लवकरच सर्वत्र प्रयोगासाठी सज्ज होत आहे. सुरुवातीच्या टप्प्यात काव्यरसिक व कला रसिक मायबाप प्रेक्षकांसाठी ओपन थिएटरच्या माध्यमातून प्रयोग सादर केले जाणार आहेत. खुल्या वातावरणात, शब्दांच्या आणि भावनांच्या सुरेल संगतीत रंगणारा हा कार्यक्रम रसिकांना एक वेगळीच अनुभूती देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

त्यानंतर पुढील टप्प्यात भव्य स्टेज कार्यक्रमांची मालिका आयोजित केली जाणार असून, अत्याधुनिक प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था आणि प्रभावी सादरीकरणाद्वारे हा कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात सादर केला जाईल.

'काव्यरंग शब्द नी:शब्द तुझाच आहे' हा केवळ कार्यक्रम नसून, शब्दांमधून आणि भावनांमधून व्यक्त होणाऱ्या जीवनतत्त्वांचा एक कलात्मक प्रवास आहे. या उपक्रमामुळे नवोदित कवी, कलाकार आणि रसिकांना एक व्यासपीठ उपलब्ध होणार असून, साहित्य-संस्कृतीच्या जतन आणि संवर्धनाला चालना मिळणार आहे.

## जुगार, सट्टाबाजीप्रकरणी चार जण ताब्यात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारतात प्रतिबंधित असलेल्या अवैधरित्या गेमींग ॲप, साईट उपलब्ध करून देत जुगार व सट्टाबाजी खेळण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून, त्याची साईट चालवून शासनाची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने चार जणांविरोधात कारवाई केली. गौतमकुमार मनवानी (२६), भुषण मरावी (२५), राजसिंग चौहाण (२१) व अलोकप्रसादक मांझी (२०) अशी आरोपींची नावे आहेत. हे आरोपी पनवेल परिसरातील मॅरेथॉन नेक्झॉन अँटीलिया, बी दुसरा माळा, रुम नं.२०३ पळस्पे येथे बेकायदेशीररित्या वास्तव्य करून भारतात प्रतिबंधित असलेल्या अवैधरित्या गेमींग ॲप, साईट उपलब्ध करून देत असत. तसेच आपसात संगनमत करून लोकांचा विश्वास संपादन करून उघडलेली बँक खाती, पासबुक, मोबाईल नंबर आदींच्याद्वारे विविध क्रिडा प्रकार हे ऑनलाईन सुविधा पुरवून भारतामध्ये प्रतिबंधित असलेल्या जुगार व सट्टाबाजी खेळण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करून त्याची साईट चालवून शासनाची फसवणूक करत असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने मिळाली. माहितीनुसार या ठिकाणी छापा टाकून गुन्हे शाखेने या चौघां आरोपींना ताब्यात घेतले. तसेच, त्यांच्याकडील विविध बँक खाती, मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर महत्वाची कागदपत्रे हस्तगत केली.

## कुणाल लोंढे यांची सहसचिवपदी नियुक्ती

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य तसेच पालघर जिल्हा कार्यकारिणी नियुक्ती सनद बहाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुणाल अशोक लोंढे यांची महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्या सह सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी बाळासाहेब शिंदे पाटील (राज्याध्यक्ष-महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), निळकंठ थोरात पाटील (खजिनदार-महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), विजय भुजंग पाटील (कार्याध्यक्ष-महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ), विकास पाटील (जिल्हाध्यक्ष-रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ), मिलिंद पोपेटा (माजी अध्यक्ष- पनवेल तालुका पो.पा.संघ), प्रमोद नाईक पाटील (अध्यक्ष-पनवेल तालुका पो.पा. संघ), संतोष गायकर पाटील (अध्यक्ष-नवीमुंबई पो. पा.संघ), विजय खुटले-पाटील कार्यकारणी सदस्य-रायगड जिल्हा पो.पा.संघ), राजेश पाटील (सदस्य-अलिबाग तालुका पो. पा.संघ) आदि उपस्थित होते.

### ४९ वर्षांनी अध्यापिकांनी जागवल्या आठवणी | रम्य रिसॉर्टमध्ये रंगला स्नेहमेळावा

# शिक्षकांच्या अश्रूंनी ओले झाले स्नेहबंध

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

काळाच्या ओघात आयुष्याने वेगवेगळे वळण घेतले, जबाबदाऱ्या वाढल्या, संसार विस्तारला. परंतु, मनाच्या कप्प्यात जपलेले कॉलेजचे दिवस मात्र तितकेच टवटवीत राहिले. तब्बल ४९ वर्षांनी माणगाव येथील शासकीय अध्यापिका विद्यालय, माणगाव येथील १९७५ ते १९७७ बॅचमधील विद्यार्थीनी एकत्र आल्या आणि आठवणींचा जणू दरवळलेला सागरच उसळून आला.

माणगाव येथील श्री वाकडाई मंदिर जवळील रम्य रिसॉर्टमध्ये हा स्नेहमेळावा रंगला. मंजिरी बापट आणि मंदा मेथा यांनी अथक परिश्रम घेत मैत्रिणींना एकत्र आणण्याचा ध्यास घेतला. नलिनी कजबजे आणि निला दांडेकर यांनी त्यांना सहकार्य केले. पत्ते, फोन नंबर शोधून ग्रुप तयार करण्याचे जिकिरीचे काम करुणा शेठ आणि संध्या दांडेकर यांनी हाती घेतले. तर नंदकुमार मेथा यांनीही या उपक्रमात मोलाची साथ दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे हरवलेले धागे पुन्हा एकदा जुळले. दिवसभर वातावरणात केवळ आनंदाची उधळण होती.



### बदलत्या काळाची हळहळ

मोरबा रोडजवळील जुन्या कॉलेजची इमारत आता पाडून त्याच ठिकाणी नवीन इमारत उभी राहिली आहे, ही बाब समजताच सर्वांच्या मनात हळहळ दाटली. त्या जुन्या वर्गखोल्या, लाकडी बाक, घंटानाद सगळं काही डोळ्यासमोर तरळत राहिलं. 'आपल्या आठवणींचं घर आता बदललं,' या भावनेने वातावरण क्षणभर स्तब्ध झाले. तब्बल ४९ वर्षांनी झालेली ही भेट केवळ स्नेहमेळावा नव्हती; ती आयुष्याच्या प्रवासातल्या सुवर्णक्षणांची पुनर्भेट होती. आता दरवर्षी भेटूया, हा निर्धार करून सर्वांनी जड अंतःकरणाने निरोप घेतला.

विविध खेळ, गप्पागोष्टी, एकत्र फोटोसेशन, सुग्रास स्नेभोजन, मनसोक्त पोहून सर्वांनी जणू पुन्हा एकदा तरुणाई अनुभवली.

व्हॅलेंटाईन डेनिमित्त एकमेकींना गुलाबपुष्प देत मैत्रीचा सुगंध दरवळवला. ४९ वर्षांपूर्वीचे डि.एड. कॉलेजमधील क्षण आठवताना काहींच्या डोळ्यांत नकळत पाणी दाटले.

यावेळी मैत्री, कृतज्ञता आणि आठवणींच्या या अविस्मरणीय क्षणांनी प्रत्येकाच्या हृदयात कायमस्वरूपी घर केले होते.

### शिक्षक म्हणून घडवलेले आयुष्य

या सर्व अध्यापिका पुढे जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत राहिल्या. विद्यार्थ्यांना घडवताना आलेले अनुभव, शाळेतील संघर्ष, पालकांशी संवाद या सगळ्या आठवणींनी स्नेहमेळावा अधिक अर्थपूर्ण केला. ज्यांनी त्यांना शिकवले त्या प्राध्यापकांच्या आठवणी सांगताना मात्र अश्रूंना बांध फुटला. त्यांच्या संस्कारांमुळेच आपण इथपर्यंत पोहोचलो, असे म्हणताना कृतज्ञतेने डोळे भरून आले.

# कळंबोली उड्डाणपुलाच्या कामाला गती



## वाहतूक कोंडीतून मिळणार दिलासा, ३० टक्के काम पूर्ण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली सर्कल येथे उड्डाणपुलाच्या कामाला अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली आहे. मुंबईपुणे महामार्ग, जेएनपीटी मार्ग आणि शहरांतर्गत वाहतुकीचा संगम असलेल्या या ठिकाणी दररोज वाहनांची वर्दळ होत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर हाती घेण्यात आलेला हा प्रकल्प नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. या प्रकल्पाचे ३० टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्रकल्पाअंतर्गत एकूण ८ आर्म आणि २ अंडरपास उभारण्यात येणार आहेत. शिळफाटा ते स्टील यार्ड, पुणे ते शिळफाटा, पुणे ते मुंबई, पनवेल ते मुंबई, मुंबई ते पनवेल, मुंबई ते जेएनपीटी, जेएनपीटी ते पुणे आणि शिळफाटा ते पुणे अशा विविध दिशांना वाहतूक सुरळीत करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पनवेल ते शिळफाटा, पनवेल ते स्टील यार्ड या दोन अंडरपासमुळे स्थानिक वाहतुकीलाही मोठी मदत होणार आहे. या उड्डाणपुलामुळे कळंबोली सर्कलवरील सिग्नलवरील ताण कमी होऊन वाहनचालकांचा वेळ व इंधनाची बचत होणार आहे. या प्रकल्पाचे ३० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईपुणे, जेएनपीटी व पनवेल दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर कळंबोली सर्कलवरील दीर्घकालीन वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण ७ उड्डाणपूल, २ उपसरणी (अंडरपास) आणि ४५ जोडमार्ग उभारण्यात येणार आहेत. काही उड्डाणपुलांसाठी पाया, पाइलिंग आणि गर्डर बसविण्याची कामे सुरू झाली आहेत. तसेच सेवा रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन वळणमार्गांची उभारणी आणि बांधकाम क्षेत्राभोवती सुरक्षात्मक बॅरिकेट्स उभारण्यात आले आहेत.

प्रकल्पाचे मॅनेजिंग हेड ऋषिकेश कोरडे यांनी सांगितले की, कळंबोली सर्कलवरील बहुस्तरीय प्रकल्प हा वाहतूक कोंडीच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय आहे. काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही विशेष दक्षता घेत आहोत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सिग्नल-विरहित व अधिक सुरळीत होईल. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल, अपघातांचे प्रमाण घटेल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

# सनियंत्रण समिती बरखास्त करा!

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान मधील हातरिक्षा ओढण्याची अमानवीय प्रथा पूर्णपणे बंद करून या श्रमिकांना एकूण ९४ पर्यावरण पूरक ई-रिक्षा देण्यात याव्यात यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले असताना देखील सनियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी हे आदेश धुडकावून लावले असून फक्त २० ई-रिक्षा देण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला आहे.

१२ फेब्रुवारी रोजी सनियंत्रण समितीचे अध्यक्ष के. पी. बक्षी, सचिव तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली यामध्ये आणखीन फक्त वीस ई-रिक्षांना परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यातील १३ ई रिक्षा प्रशासन खरेदी करणार असून सात ई-रिक्षा नगरपरिषदेने उपलब्ध करून द्याव्यात असे निर्देश बैठकीत देण्यात आले आहेत.त्याबाबतची अंमलबजावणी केव्हा होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

सध्या वीस ई-रिक्षा सुरू असल्या तरी त्यासुध्दा वाढत्या पर्यटनामुळे खूपच कमी पडत आहेत.त्यामुळे उर्वरित ५४ हातरिक्षा चालकांच्या वाट्याला पुन्हा एकदा ही अमानवीय प्रथा नशिबी असणार आहे. सनियंत्रण समितीने घेतलेल्या या निर्णयामुळे ही समिती ज्यांना या गावाविषयी सहानुभूती नाही, इथले पर्यटन बहरावे, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याबाबत काहीएक देणेघेणे नसल्याने ही समितीच बरखास्त करून टाकावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

सनियंत्रण समितीच्या झालेल्या बैठकीत प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत काही निमंत्रित पदाधिकारी, पर्यावरण क्षेत्रात काम करणारे काही सामाजिक कार्यकर्ते आणि रिक्षा संघटनेचे काही सदस्य उपस्थित होते.या प्रतिनिधींना बैठकीत चर्चा करण्याची कोणतीही संधी दिली नाही. समितीने सर्वोच्च न्यायालयाचे आदेश धुडकावल्याने ई-रिक्षा वाढीसंदर्भात प्रश्न पुन्हा एकदा चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातुन याठिकाणी पर्यटक येत असतात.स्वातंत्र्य पूर्वकाळापासून इथे हातरिक्षा ओढण्याची अमानवीय प्रथा सुरू आहे.ही प्रथा बंद करण्यासाठी स्थानिकांनी थेट न्यायालयात धाव घेतली होती.त्यानंतर ई-रिक्षाचा प्रायोगिक तत्वावरील प्रयोग यशस्वी झाल्याचा अहवाल आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ६ फेब्रुवारीपर्यंत ७४ हातरिक्षा बंद करून चालकांचे ई-रिक्षा द्वारे पुनर्वसन करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते. ही मुदत संपून गेल्यावर आंदोलन सुध्दा करण्यात आले त्यानंतर प्रशासनाने १२ फेब्रुवारी पर्यंतची मुदतवाढ मागवून घेतली होती.

# बँक कर्मचाऱ्यांचा संप यशस्वी



**। रायगड । प्रतिनिधी ।**

कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केले आहेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलामी कडे नेणारे आहेत ते त्वरित परत घावेत व कामगारांची पिळवणूक थांबवावी यासाठी बँकिंग क्षेत्रात ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन, ऑल इंडिया बँक ऑफिसर्स अससोसिएशन आणि बँक एम्प्लॉईज फेडेरेशन ऑफ इंडिया अंतर्गत विविध बँकांमधील कर्मचारी व अधिकारी संघटनेने एक दिवसाचा संप यशस्वी केला.

या संपाची प्रमुख मागणी म्हणजे केंद्र सरकारने लागू केलेले चार कामगार कायदे तात्काळ रद्द करावेत. सोबतच आय. डी.बी.आय. बँकेच्या प्रस्थावित खाजगीकरणाला तीव्र विरोध, खाजगी बँकांमधील विदेशी भांडवल मर्यादा ७५% पर्यंत वाढविण्याच्या निर्णयाला विरोध, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील विदेशी भांडवल मर्यादा ४९ टक्क्यापर्यंत नेण्याच्या धोरणास विरोध, तसेच सरकारकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या बँक विलीनीकरण व खाजगीकरणाबाबतच्या विसंगत व दिशाभूल करणाऱ्या विधानामुळे बँकिंग उद्योगात निर्माण झालेल्या अस्थिरतेचा निषेध करण्यात आला.

संपाच्या दिवशी मुंबई महानगरातील, ठाणे व नवी मुंबई येथील बँक कर्मचारी आझाद मैदान, मुंबई येथे एकत्र येऊन जोरदार निदर्शने देऊन त्यांनी आपला राग व्यक्त केला. भारतभर आणि महाराष्ट्रातील इतर शहरांमध्येही सुद्धा निदर्शने, मोर्चे, सभा व मेळावे आयोजित करण्यात आले होते. हा संप केवळ कामगारांच्या हक्कासाठी नसून, सार्वजनिक क्षेत्र, रोजगार सुरक्षा, आणि देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठीचा निर्णायक लढा असल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

या देशव्यापी संपामध्ये सहभागी होऊन संप यशस्वी करण्यात आला. यावेळी जनरल सेक्रेटरी एन. शंकर, ललिता जोशी, बी. जयराम, सुधीर पाटील, अरविंद मोरे, सुमित नाम्बियार, रत्नाकर वानखडे, चंद्रशेखर साळुंखे, स्वप्नील कोंडुस्कर, फ्रान्सिस, महेंद्र प्रभुळकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रव्यापी संपाला महाराष्ट्र जागृत कष्टकरी कामगार युनियनचा पाठिंबा

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

भारत जोडो अभियान, कामगार संघटना, शेतमजुर संघटना आणि कर्मचारी संघटनांच्या संयुक्त मंचाने पुकारलेल्या राष्ट्रव्यापी संपाला महाराष्ट्र जागृत कष्टकरी कामगार युनियन कोणतीही अट न घालता संपुर्ण पाठिंबा दिला होता.

हा संप मनरेगाची तात्काळ पुनर्वहाली, चार श्रम संहिता रदद करणे, शांती आधिनियम, वीज विधेयक आणि विद्युत सुधारणा विधेयक मागे घेणे तसेच भारत अमेरिका व्यापाराच्या अंतरिम करार रद्द करण्याच्या मागणीसाठी आहे.२०१४ मध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यानंतरच्या काळात देशाच्या मूलभूत उत्पादकांचे,



शेतकरी आणि कष्टकरी वर्गाचे हित काही मोजक्या मित्र पूंजपतींच्या फायद्यासाठी सातत्याने शेतकरी मजूर आणि अगदी वेतन धारक वर्गाचेही प्रत्यक्ष उत्पन्न स्थिर राहिले आहे तर काही निवडक पूंजपती घराण्यांनी अभूतपूर्व नफा कमावला आहे.

वाढती असमानता आणि व्यापक बेरोजगारीची भीषण परिस्थिती यांचा उल्लेख सरकारच्या स्वतःच्या आर्थिक सर्वेक्षणांमध्ये करण्यात आला आहे. तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अहवालांमधून घरगुती पातळीवरील वाढत्या कर्जाकडे सातत्याने लक्ष वेधले जात आहे. तरीही सुधारात्मक पावले उचलण्याऐवजी केंद्र सरकार उलट दिशेने जाणाऱ्या धोरणांचा अवलंब करत आहे.चार श्रम संहिता अंतर्गत लागू करण्यात आलेले नवे नियम भारतीय कामगार वर्गाच्या वाटाघटीच्या शक्तीवर आणि त्यांच्या उरलेल्या संरक्षण व्यवस्थांवर थेट आघात करणारे आहेत. भारत-अमेरीका व्यापाराच्या अंतरीम काराराची चौकट ही शेतकयांच्यां हिताचा त्याग करणारी आहे. अधिनियम २०२५ कामगारांच्या सौदेबाजीच्या शक्तीला तसेच भारतीय संघराज्य व्यवस्थेला दोन्हींना हानी पोहोचवतो. शांती आधिनियम तसेच भारत-अमेरीका व्यापार कराराच्या माध्यमात जीएम युक्त पशुखाद्य आणि खाद्यतेलांचा होणारा पूर सामान्य जनतेच्या आरोग्य व सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण करतो.

हे एनडीए सरकार आपल्या जनादेशाशी आणि भारतीय जनतेशी पूर्णतः विश्वासघात करत आहे. भारतीय जनतेने दशकानुदशके संघटित प्रयत्न व संघर्षातून मिळवलेले हक्क आणि संरक्षणे वेगाने विकून टाकण्याच्या मार्गावर हा सरकार आहे. विकसित भारत या भ्रमात प्रत्यक्षात ही सरकार गुलामीची स्थिती पुन्हा आणत आहे. जिथे रोजगार कमी होत असल्याने मोठ्या प्रमाणावर कामगारांना नोकरी गमावण्याचा धोका आहे जिथे अल्प वेतनावर अतिशय दीर्घ तास काम करावे लागते आणि जिथे दीर्घ संघर्षातून मिळवलेली अन्नसुरक्षा हिरावून घेतली जात आहे.

आता भारतातील जनतेने एकत्र येऊन या विनाशकारी धोरणांचा प्रतिकार करणे आणि या सरकारला रोखणे अत्यावश्यक आहे,असे निवेदन देण्यात आले.

# शाळकरी मुलांचा पायी प्रवास धोकादायक

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

दांड-रसायनी या मार्गावर दोन्ही बाजूला दुकाने असून शाळेत जाताना शाळकरी मुले पायी चालत जाणे पसंत करीत असतात, मात्र मागील काही महिन्यापूर्वी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे पालकांच्या मनात आपल्या पाल्यांविषयी भीती निर्माण होत असून, मुलगा शाळेत पोहचेपर्यंत ते घरी येईपर्यंत पालक भीतीच्या छायेखाली असल्याचे मत पालक वर्ग करीत आहे.

या मार्गावरून पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या वाहनांची रहदारी सुरुच असते.यावेळी दांडमार्गे रिस मोहोपाडा दिशेने येणारी वाहने सुसाट चालवली जात असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत आहे. भटवाडीजवळ उतार असल्याने वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी गतिरोधकाची आवश्यकता आहे. येथे गतिरोधक नसल्याने वाहने वेगात चालवली जात असल्याने लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

भटवाडी थांब्यासमोर गतिरोधक न लावल्यास नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# मॉडर्न स्कूलमध्ये जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल व ज्युनियर कॉलेज, वाशी येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था राहटोली, ठाणे यांच्या माध्यमातून जिल्हास्तरीय अटल टिंकरिंग विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडला.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये नवी मुंबई महानगरपालिका तसेच ठाणे जिल्ह्यातील अटल टीकरिंग लॅब असलेल्या सर्व शाळांमधील तालुकास्तरावर विजेत्या शाळांचे प्रकल्प मांडण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन नवी मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते झाले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय वाघ, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहाटोली, ठाणे, तसेच डॉ. प्रभा खारतमोल, वरिष्ठ अधिव्याख्याता, ठाणे, अरुंधती जाधव, अटल टिंकरिंग प्रकल्प समन्वयक त्याचप्रमाणे प्रदीप गवाडे उपस्थित होते. सागर वैष्णव, सुभाष नांदुरकर व कुशल सावंत यांचे या प्रदर्शनासाठी विशेष सहकार्य लाभले. तसेच परीक्षक म्हणून दीप्ती कुलकर्णी, डॉ. परेश गायकवाड, स्वाती जावळे व ऋषिकेश पेलवे यांनी कार्य पाहिले. पानसरे व बावस्कर यांचेही विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमासाठी मॉडर्न स्कूलच्या प्राचार्या, सुमित्रा भोसले यांनी उद्घाटनपर भाषणातून सहभागी विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मॉडर्न स्कूलचे शिक्षक तुषार म्हात्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विलास कुडावकर यांनी केले. या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी मॉडर्नच्या विज्ञान शिक्षकांचे विशेष योगदान लाभले. यामध्ये निहारिका आर्या, सविता जाधव, अखिला शेट्टी, रेनुका पुजारी, नीलम मोकाशी, सुहास गावंड व माळी यांचा विशेष सहभाग होता. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी विज्ञानातील नवकल्पना, प्रयोगशीलता व तांत्रिक कौशल्य यांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

# दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.

या निरोप समारंभाच्या निमित्ताने, अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील, सागर खारपाटील, अर्चना खारपटील, वर्षा खारपाटील, सुनीता खारपाटील यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले. तर प्रशासकीय अधिकारी व्ही.ए.पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, कार्याध्यक्ष विजय पवार, जि.बी. म्हात्रे, शिक्षक प्रतिनिधी जिचंद भगत, डी.पी. पाटील, अशोक



पाटील, पुंडलिक भवर, शुभम जाधव, अतुल गावंड, मोहिते, प्रदीप रसाळ, उत्तम म्हात्रे, रेखा धराडे मंथना ठाकूर, विनिता भोईर, माधुरी ठाकूर, अस्मिता निकम, विशाखा पाटील, मयुरी नारंगीकर, प्रियांका वशेणीकर, ऋतुजा ठाकूर, कृष्णा माळी, संतोष चव्हाण, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी निरोप समारंभास उपस्थित राहून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी प्रस्तावना त्रिशा म्हात्रे व जिज्ञासा पाटील यांनी सुंदर शब्दात केली, त्यानंतर विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही आपले मनोगत व्यक्त केले, भविष्यात आपण मोठे होणार आहात, आई वडिलांना विसरू नका, मोठ्यांचा आदर करा, स्पर्धेचे युग आहे, सर्वोच्च स्तरावर विराजमान व्हा, मार्गदर्शनाची गरज लागेल, तेव्हा शाळेत या. शाळा तुमचीच आहे, असे शिक्षकांनी सांगितले.

# शिवजयंती सोहळ्याचे आयोजन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमिब मिरारोड पूर्व येथील पेणकर पाड्यातील सर्व शिवभक्त आणि शिव मावळे यांच्यावतीने पेणकर पाडा येथे एक गाव एक शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान मशाल मिरवणूक, महाराजांची पूजा, महाआरती, भव्य मिरवणूक, आकर्षक मर्दानी खेळ मल्लखांब, वक्तृत्व आणि खुल्या नृत्य स्पर्धा, पोवाडे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी अत्यावश्यक आहे.

# दिंडीसाठी रिफ्लेक्टर जॅकेट्सचा अभिनव उपक्रम

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून घाटमाथ्याकडे प्रस्थान करणाऱ्या भाविकांच्या दिंड्या हा श्रद्धेचा प्रवास असला, तरी तो अनेकदा जीवघेणा ठरतो. वाहनचालकांना रस्त्यावर चालणाऱ्या भाविकांचा अचूक अंदाज येत नाही. परिणामी छोटेमोठे अपघात घडतात आणि काही वेळा जीवितहानीही होते.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन खालापूर तालुक्यातील चौकट बरी गावातून शनि शिंगणापूर येथे जाणाऱ्या दिंडीसाठी अपघातग्रस्तांच्या रदतीसाठी सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून धनंजय गीध यांच्या पुढाकाराने एक महत्त्वपूर्ण आणि जीवनरक्षक उपक्रम राबविण्यात आला. दिंडीत सहभागी प्रत्येक भाविकाला रिफ्लेक्टर सेफ्टी जॅकेट्स, कॅप्स आणि सिग्नल बॅटन देण्यात आली. घाटातील अंधाऱ्या आणि धोकादायक वळणांवर भाविक स्पष्ट दिसावेत, यासाठी ही साधने अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

या निमित्ताने हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांनी सामाजिक संघटनांना आवाहन केले की, पारंपरिक अन्नदानाबरोबरच आता जीवनदान देण्याच्या दृष्टीने सुरक्षा साधनांचे वाटप करणे काळाची गरज आहे. श्रद्धेला सुरक्षिततेची जोड दिल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

दिंडी प्रमुखांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अनेक वर्षे दिंडीत सहभागी होत असताना अन्नदानाचा अनुभव घेतला; मात्र सर्वांच्या जीवनरक्षणासाठी सुरक्षा साधने देण्याचा हा पहिलाच प्रयत्न असून तो एक सकारात्मक पायंडा ठरेल. सुरक्षेचे सर्व निकष पाळण्याचे अभिवचनही त्यांनी दिले.

या उपक्रमात गुरुनाथ साठेलकर, धनंजय गीध, अमोल कदम, महेश भोसले, पंकज बागुल आणि ऋषिकेश विश्वकर्मा यांचा सक्रिय सहभाग होता. महामार्ग पोलीस आणि आरटीओ विभागालाही या उपक्रमातून सहकार्य होईल, तसेच समाजप्रशासन समन्वयातून अपघातमुक्त दिंडीचा आदर्श निर्माण होईल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला आहे.

**मोहिमेत सहभागी होण्यासाठी अनेक उत्साही | गडाचा सभोवतालचा परिसर व इतिहासाची मिळणार माहिती**

# शिवजयंतीला करणार सरसगड प्रदक्षिणा

**। पाली । प्रतिनिधी ।**

पाली, सुधागड संघर्ष संस्था मधील तरुणांनी रायगड प्रदक्षिणा प्रमाणे सरसगड प्रदक्षिणा शिवजयंतीला गुरुवारी (दि. १९) सकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. यंदाचे हे दुसरे वर्ष असून मागील वर्षी तब्बल ५२ जण या प्रदक्षिणेत सहभागी झाले होते. या प्रदक्षिणेमुळे सरसगडाच्या भोवतालच्या ऐतिहासिक व नैसर्गिक परिसराची माहिती अनेकांना मिळते. त्यामुळे या मोहिमेत सहभागी होण्यासाठी अनेकजण उत्साही आहेत.

या प्रदक्षिणेचा मार्ग खडतर आहे. साहसी, जबाबदार ट्रेकिंगप्रेमीनी अवघड आणि जिद्दी अशा अविस्मरणीय प्रदक्षिणेचा अनुभव जरूर घ्यायला हवा. मात्र अतिउत्साही व नियम न पाळणाऱ्या ट्रेकर्सने भाग घेऊ नये. असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

सरसगड प्रदक्षिणेचा प्राथमिक मार्ग तरुणांनी व सदस्यांनी पाहिला असून मार्गावर साफसफाई व दिशादर्शक नोंदी देखील करण्यात आल्या आहेत.

सरसगड प्रदक्षिणेसाठी १०० रूपये एवढी नाममात्र नोंदणी फी आकारली आहे. नोंदणीसाठी संपर्क अरविंद दंत ९२७२०७१५३४, कपिल पाटील ९२२६७८४२५५, अमित निंबाळकर ९२७३७९०८५०, प्रदीप गोळे ८०८७५६९२९२ व मिलिंद गोळे ८४४६२८८१४२ यांच्याकडे करावा. इतर माहिती, अटी व शर्ती नोंदणी करताना दिल्या जातील. प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. असे संघर्ष संस्थेतर्फे सांगण्यात आले.



### गडावरील वास्तू आणि सांस्कृतिक वारसा

किल्ल्यावर बाराही महिने स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध असलेला ३ मीटर खोल मोती हौद असून, बालेकिल्ल्याच्या पायथ्याशी असे एकूण दहा हौद आहेत. गडाच्या परिसरात घोड्याची पागा, धान्य कोठारे, शस्त्रागारे, कैदखाने आणि दारू कोठारे कोरलेली आहेत. बालेकिल्ल्यावर जोगेश्वरी (केदारेश्वर) मंदिर आणि शहापीर दर्गा असल्याने येथे धार्मिक सलोखा पाहायला मिळतो.

### ऐतिहासिक महत्त्व आणि दुर्गम रचना

प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेले पाली गाव सरसगड किल्ल्याच्या कुशीत वसलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडाचे महत्त्व ओळखून तो स्वराज्यात सामील केला आणि त्याच्या दुरुस्तीसाठी दोन हजार होण मंजूर केले होते. समुद्रसपाटीपासून ४९० मीटर उंचीवर असलेल्या या किल्ल्याची बांधणी दुर्गमता आणि विपूल जलसंचय यावर भर देऊन करण्यात आली आहे. दूरवर टेहळणी करण्यासाठी सरस असल्याने या किल्ल्याला सरसगड हे नाव मिळाले. किल्ल्याच्या दक्षिण बाजूला एकाच दगडात घडविलेल्या १११ पायऱ्या हे या गडाचे प्रमुख वैशिष्ट्य असून, गडाला दिंडी दरवाजा या नावाने ओळखले जाणारे मजबूत प्रवेशद्वार आणि तटबंदीचे संरक्षण आहे.

> “सरसगड प्रदक्षिणेचे हे दुसरे वर्ष असून, या मोहिमेद्वारे तरुणांना गडाचा इतिहास आणि त्याभोवतीचा नैसर्गिक ठेवा जवळून अनुभवता येईल. रायगड प्रदक्षिणेच्या धर्तीवर आयोजित ही मोहीम खडतर असली तरी, साहसी ट्रेकर्ससाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरेल. शिवजयंतीच्या निमित्ताने ऐतिहासिक वारसा जतन करणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे.”
>
> -प्रदीप (दादू) गोळे, आयोजक, सुधागड संघर्ष संस्था.

## निवडक



### पाकिस्तानच्या डगआऊटमध्ये घुसला साप

**कोलंबो :** टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारत विरुद्ध पाकिस्तान हा बहुचर्चित सामना रविवारी (दि.१५) कोलंबोच्या आर प्रेमदासा स्टेडियमवर पार पडला. या सामन्याची बऱ्याच दिवसांपासून चर्चा होती. अशातच सामन्याच्या आधी एक भीतीदायक घटना घडली. पाकिस्तानच्या डगआऊटमध्ये चक्क मोठा साप घुसला होता. आर प्रेमदासा स्टेडियममधील पाकिस्तान संघाचे ज्या ठिकाणी डगआऊट आहे त्या ठिकाणी शनिवारी (दि.१४) एक मोठा लांबलचक साप घुसला होता. त्यावेळी पाकिस्तानचा संघ सराव करत होता. त्यानंतर ग्राऊंड स्टाफ आणि काही सर्पमित्रांनी त्या सापाला धरले आणि त्याला स्टेडियममधून सुरक्षित बाहेर नेण्यात आले. या घटनेचा व्हिडिओ सध्या जोरदार व्हायरल होत आहे.दरम्यान, श्रीलंकेच असे क्रिकेटमैदानात साप येणे हे नवीन नाही. यापूर्वीही अनेकदा श्रीलंकेच्या मैदानांवर क्रिकेट सामन्यांदरम्यानही साप आल्याचे दिसले आहेत.



### इंग्लंड संघाचा स्कॉटलंडवर विजय

**कोलकाता :** इंग्लंड संघाने स्कॉटलंडचा ५ गडी आणि १० चेंडू राखून पराभव केला आणि टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेतील 'क' गटात दुसरे स्थान मिळवले आहे. परंतु, सुपर-८ फेरीतील स्थान निश्चित होण्यासाठी त्यांना अखेरच्या साखळी सामन्यापर्यंत वाट पाहावी लागणार आहे. टी-२० विश्वकरंडक दोनदा जिंकणाऱ्या आणि संघात चांगले आक्रमक फलंदाज असताना इंग्लंडसाठी १५३ धावांचे आव्हान कठीण नव्हते; परंतु, फिल साल्ट आणि जॉश बटलर पहिल्या २ षटकांत बाद झाल्यावर इंग्लंड संघासमोर काजवे चमकले होते. त्यानंतर १० षटकांचा खेळ होत असताना कर्णधार हॅरीब्रुकसह ४ फलंदाज ८६ धावांत गमावले होते. टॉम बॅन्टनने एका बाजूने अखेरपर्यंत किल्ला लढवत नाबाद ६३ धावांची खेळी केली. तत्पूर्वी इंग्लंडच्या गोलंदाजांनी स्कॉटलंडची ३ बाद ४२ अशी अवस्था केली होती; मात्र, रिची बॅरिंग्टन (४९) आणि टॉम ब्रुस (२४) यांच्या योगदानामिळे त्यांनी १३व्या षटकापर्यंत ३ बाद ११३ धावांपर्यंत मजल मारली होती. हे दोघे फलंदाज बाद झाल्यावर स्कॉटलंडचा डाव घसरला आणि त्यांची धावसंख्या १५२ पर्यंत मर्यादित राहिली.



### दक्षिण आफ्रिकेची विजयाची हॅटट्रीक

**अहमदाबाद :** पुरूष टी-२० विश्वचषकामध्ये शनिवारी (दि.१४) दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा ७ गडी राखून पराभव केला. दक्षिण आफ्रिकेने सलग तीन सामने जिंकले असून न्यूझीलंडने आपला पहिला सामना गमावला. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ गडी गमावत १७५ धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने कर्णधार एडन मार्करमच्या स्फोटक खेळीमुळे १७.१ षटकातच लक्ष्य गाठले. त्यामुळे 'ड' गटात दक्षिण आफ्रिका गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आली आहे. तत्पूर्वी फलंदाजीसाठी आलेल्या न्यूझीलंडने पॉवरप्लेमध्येच ३ गडी गमावले. त्यामध्ये रविंद्र आणि ऍलन यांचे बळी घेतले. ऍलनने सुरूवात चांगली केली होती; मात्र, यान्सेनच्या गोलंदाजीपुढे त्याचा निभाव लागला नाही. तो ३१ धावा करत बाद झाला. चॅपमनची खेळी सर्वोत्तम ठरली. त्याने ४८ धावा काढल्या. तसेच, डॅरिल मिचेलसोबत पाचव्या बळीसाठी केलेली ७४ धावांची भागीदारी सर्वात मोठी भागीदारी ठरली. मिचेलने ३२ धावा काढल्या. या स्पर्धेत न्यूझीलंडचा पुढील सामना १७ फेब्रुवारीला कॅनडाविरुद्ध आणि दक्षिण आफ्रिकेचा १८ फेब्रुवारीला युएईविरुद्ध आहे. तसेच, दक्षिण आफ्रिका सुपर-८मध्ये पोहोचला आहे.

# चिन्नास्वामीतील स्टँड्सला दिग्गजांचे नाव

- कर्नाटक क्रिकेट असोसिएशनचा निर्णय
- कुंबळे, द्रविड, शांता रंगस्वामी यांचा सन्मान



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेटच्या आजपर्यंतच्या इतिहासात अनेक खेळाडूंनी मोलाचा वाटा उचलला आहे. आजपर्यंत अनेक दिग्गज क्रिकेटपटूंची नावे देशातील विविध स्टेडियममधील स्टँड्सला देण्यात आली आहेत. आता त्यात भारताचा महान फलंदाज माजी कर्णधार राहुल द्रविड, भारताचा महान गोलंदाज अनिल कुंबळे आणि शांता रंगस्वामी यांचाही समावेश झाला आहे. विशेष म्हणजे कुंबळे आणि द्रविड या दोघांनीही भारताचे प्रशिक्षकपदही सांभाळले आहे. या तिघांचे नाव बंगळुरूमधील एम चिन्नास्वामी स्टेडियमवरील स्टँड्सला देण्यात येणार आहेत. याबाबत कर्नाटक क्रिकेट असोसिएशनने घोषणा केली असुन नुकताच त्यासंदर्भात कार्यक्रमही पार पडला. कर्नाटक क्रिकेट असोसिएशनने माजी क्रिकेटपटू वेंकटेश प्रसादच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला.

यावेळी द्रविड बोलताना काहीसा भावूकही झाला होता. त्याने यावेळी त्याच्या वडिलांना खूप आनंद होईल, अशा भावनाही व्यक्त केल्या आहेत. त्याने वेंकटेश प्रसादचे आभार मानताना म्हणाला की, मला माहित आहे माझ्या कुटुंबासाठी याचे महत्त्व खूप मोठे आहे. तुम्हाला सर्वांनाच माहित आहे, माझ्या वडिलांना हा खेळ खूप आवडायचा. माझ्यात खेळाची आवड रुजवण्यात त्यांनी खरोखर मोठी भूमिका निभावली. ते मला येथे खूप सामने पाहण्यासाठी घेऊन यायचे. केवळ कसोटी सामनेच नाही, तर रणजी चषक सामन्यांसाठीही घेऊन यायचे. जेव्हा मी लहान होतो, तेव्हा त्यांना जेव्हाही सुट्टी मिळायची तेव्हा ते किमान एका दिवसासाठी तरी क्रिकेटचा सामना पाहाण्यासाठी मला घेऊन यायचे. मला वाटते आज त्यांना खूप अभिमान वाटत असेल की त्यांच्या मुलाचे नाव स्टँडला देण्यात आले आहे. अनिल कुंबळे म्हणाला की, असे म्हणणे वावगे ठरणार नाही की आपल्या सर्वांच्या योगदानामुळे कर्नाट क्रिकेटला बनवले आहे. खरंतर कर्नाटक क्रिकेटने आपल्याला बनवले आहे. कोणत्या स्टँडला कोणाचे नाव, हे फार महत्त्वाचे नाही. योगदानाचा सन्मान केला जात आहे, हे अधिक खास आहे आणि ते योगदान कायमस्वरुपी स्टेडियमवर कोरले जाणार आहे.

### ऐतिहासिक खेळी

राहुल द्रविड आणि अनिल कुंबळे कर्नाटककडूनही एकत्र खेळले आहेत. राहुल द्रविडने ५०९ आंतरराष्ट्रीय सामन्यांतील ६०५ डावात २४,२०८ धावा केल्या आहेत. त्यामध्ये ४८ शतकांचा समावेश आहे. अनिक कुंबळेने ४०३ आंतरराष्ट्रीय सामन्यांत ९५६ बळी घेतले आहेत. सध्या ७२ वर्षांच्या असलेल्या शांत रंगस्वामी यांनी भारतीय महिला संघासाठी १९७६ ते १९९१ दरम्यान १६ कसोटी आणि १९ एकदिवसीय सामने खेळल्या आहेत. त्यांनी १००० हून अधिक धावा केल्या आहेत.

> “चिन्नास्वामी स्टेडियम हे दुसरे घर होते. मी आणि अनिल कुंबळे आमच्या घरापेक्षा येथे जास्त वेळ घालवायचे. या जागेने खूप आनंद आणि कधीकधी निराशाही दिली, पण आज जे काही आहे, ते या जागेने दिले आहे. कर्नाटक क्रिकेट असोसिएशनचेही आभार. शांता रंगस्वामी यांचेही कौतुक. त्यांच्यासोबत स्टँडला नाव मिळणे हा मोठा सन्मान आहे. भारतीय महिला क्रिकेटच्या यशाचा पाया रचणाऱ्या क्रिकेटपटूंपैकी त्या एक आहेत.”
>
> – **राहुल द्रविड**, माजी कर्णधार व प्रशिक्षक, भारत

## वेस्ट इंडिजचा नेपाळवर विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकामध्ये रविवारी (दि.१५) वेस्ट इंडिज आणि नेपाळ यांच्यात सामना खेळला गेला. या सामन्यात वेस्ट इंडिजने चमकदार कामगिरी करत नेपाळचा ९ गडी राखून पराभव केला. या विजयासोबतच वेस्ट इंडिज 'सुपर ८' फेरीसाठी पात्र ठरणारा पहिला संघ बनला आहे. प्रथम फलंदाजी करताना नेपाळने २० षटकांत ८ बाद १३३ धावा केल्या होत्या. वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांसमोर नेपाळला चांगली सुरुवात मिळू शकली नाही. १३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजने कमाल केली. सलामीवीर ब्रँडन किंगने२२ धावांची खेळी केली, तर शाई होप ६१ धावा करून नाबाद राहिला. यासोबतच शिमरॉन हेटमायरनेही ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. वेस्ट इंडिजने १५.२ षटकांत केवळ १ गडी गमावून १३४ धावा पूर्ण केल्या आणि सामना ९ गडी राखून जिंकला.

# यंगस्टार खारपाडा संघाला विजेतेपद



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

खारपाडा येथील श्री कुलदैवत क्रिकेट स्पोर्ट्सच्यावतीने शनिवारी (दि.१४) येथील मैदानावर एक दिवसीय दिवस-रात्र अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यंगस्टार खारपाडा संघाने जेतेपद पटकावले आहे. या स्पर्धेला खेळाडूंसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या सामन्यामध्ये स्थानिक ८ तसेच बाहेरील ८ संघांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. प्रत्येक सामन्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. अंतिम सामन्यात दमदार आणि संयमी खेळ करत यंगस्टार खारपाडा संघाने विजेतेपद मिळविले. तर, शांतिनगर जिते संघाने द्वितीय पारितोषिक मिळवत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना देखील सन्मानचिन्ह व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. त्यात उत्कृष्ट गोलंदांज म्हणून उपेश घरत (खारपाडा) व उत्कृष्ट फलंदाज म्हणून कौतुक म्हात्रे (जिते) यांना गौरवण्यात आले. तर, अनिरुद्ध ठाकूर (खारपाडा) हा मालिकावीर ठरला. खारपाडा येथील मैदानावर पार पडलेल्या या दिवस-रात्र अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेमुळे युवकांमध्ये क्रीडाप्रेमाची भावना अधिक दृढ झाली आहे. या स्पर्धेचे आयोजन, नियोजन व व्यवस्थापन शिस्तबद्ध व

# 'आम्ही भूमीपुत्र कलाकार' उत्साहात




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

अमन कैलास वास्कर आयोजित 'आम्ही भूमीपुत्र कलाकार प्रीमियर लीग' दिवस-रात्र क्रिकेट सामने कुंडे वहाळ गावाच्या औटी मैदानावर पार पडले. या स्पर्धेत डी.पी. फायटर्स, बहिरीनाथ कलाप्रेमी चॅनेल, ए.एन. क्रिएशन, ए.बी. इंडियन्स, टीम अगाव आणि रोशन अण्णाची कॉमेडी, सृष्टी स्पोर्ट्स अशा एकूण ६ संघानी भाग घेतला होता.

या स्पर्धेमध्ये डी.पी. फायटर्स संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले. तर, बहिरीनाथ कलाप्रेमी युट्यूब चॅनेल संघ उपविजेता ठरला. तर, विक्रम ठाकूर (धुतूम), अमर म्हात्रे (मोरावे) व प्रतीक ठाकूर (बेलपाडा) यांनी उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज व क्षेत्ररक्षणाची कामगिरी बजावली. या सर्वांना पारितोषिके देण्यात आली. कर्णधार दिगंबर कोळी यांच्या बहिरीनाथ कलाप्रेमी लेडीज देवयानी दिगंबर कोळी यांच्या संघानेने शो मॅचमध्ये विजय मिळवला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार कैलासराजे घरत, अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, कर्णधार दिगंबर कोळी आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते. तसेच, या प्रीमियर लीगमध्ये सर्व कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी चिंतामण शिवडीकर, राजेश खर्डे, रंजिता पाटील, साधन भोईर, वृषाली भोईर, विनायक, रश्मिता पोपेटा, आकाश म्हात्रे, रजनी मेढेकर, वैशाली म्हात्रे, विकिता म्हात्रे, राजश्री कोळी, उपासना घोसाळकर, दर्शना ठाकूर, सोमनाथ कोळी, स्पर्धेचे पंच हरिश्चंद्र फडके, लालचंद गावंड, राजेश पाटील, गुणलेखक सोमनाथ पाटील, समालोचक मनोज म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

# पलाश-स्मृती वाद उच्च न्यायलयात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

क्रिकेटपटू स्मृती मानधना आणि संगीतकार पलाश मुच्छल यांच्या वैयक्तिक आयुष्यातील वाद आता उच्च न्यायालयता गेला आहे. उच्च न्यायालयाने स्मृतीचा बालमित्र असल्याचा दावा करणारा निर्माता-अभिनेता विज्ञान मानेला याला पलाश याच्याबाबतच्या कथित बदनामीकारक, आक्षेपार्ह विधाने करण्यापासून नुकतीच मनाई केली. विज्ञान मानेने अलीकडे दिलेल्या एका मुलाखतीमध्ये पलाशविरुद्ध बदनामीकारक भाष्य केले होते.



पलाशने विज्ञानविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, व्यावसायिक वादातून विज्ञानने त्याच्यासह कुटुंबाविरुद्ध बदनामीकारक विधाने केल्याचा दावा केला होता. त्याचप्रमाणे त्याबद्दल नुकसानभरपाई आणि आक्षेपार्ह विधाने करण्यापासून कायमस्वरूपी मनाईचे आदेश देण्याची मागणी केली होती. याचिकेची न्या. मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने गंभीर दखल घेतली. विज्ञानने केलेल्या टिप्पण्या प्रथमदर्शनी बदनामीकारक असल्याचे नमूद करून पलाशला अंतरिम दिलासा दिला. तसेच, अशा टिपणीमुळे एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकते, असेही पलाशला पुढील सुनावणीपर्यंत अंतरिम दिलासा देताना न्यायालयाने नमूद केले.

## लॉकी फर्ग्युसन मायदेशी परतला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात सुपर ८ फेरीसाठी चुरशीची शर्यत पाहायला मिळत आहेत. परंतु, अशातच न्यूझीलंड संघाबाबत एक महत्त्वाची अपडेट आली आहे. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसन रविवारी (दि.१५) त्याच्या घरी परतला आहे. तो त्याच्या पहिल्या अपत्याच्या जन्मासाठी मायदेशी परतला आहे. मात्र, असे असले तरी फर्ग्युसन या विश्वचषकातून बाहेर झालेला नाही. तो पुढच्या टप्प्यात पुन्हा संघात सामील होऊ शकतो.

# भारताचा पाकिस्तानवर विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशियाई रायझिंग स्टार्स महिला क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तान संघावर दणदणीत विजयाची नोंद केली आहे. भारतीय महिलांनी ८ गडी व ५९ चेंडू राखून पाकिस्तानला पराभूत करताना उपांत्य फेरीच्या आशा जीवंत ठेवल्या आहेत. भारतीय गोलंदाजांनी सुरेख मारा करताना पाकिस्तानला १८.५ षटकांत ९३ धावांवर गुंडाळले. सैमा ठाकोर, राधा यादव व प्रेमा रावत यांनी प्रत्येकी दोन बळीख तर जिंतिमनी कलिता व मिन्नू मणी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. पाकिस्तानकडून शवाल जुल्फिकारने सर्वाधिक २३ धावा केल्या, त्यानंतर गुल रुख (२१) व अनोषा नासिर (१७) यांनी चांगली खेळी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सलामीवीर हुमैरा काझी शुन्यवर बाद झाली. दिनेश वृंदा आणि अनुष्का शर्मा यांनी दुसऱ्या बळीसाठी ७९ धावा जोडल्या. अनुष्का २४ धावांवर बाद झाली. त्यानंतर दिनेशने ५५ धावांनी नाबाद खेळी केली. तेजलने १२ धावा करूनस संघाला १०.१ षटकांत २ बाद ९७ धावा करून विजय मिळवून दिला. भारताने या विजयासह 'अ' गटात गुणाचे खाते उघडले.

# भारतीय संघाची पराभवाची हॅटट्रीक

**। ओडिसा । वृत्तसंस्था ।**

ओडिसाच्या बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियममध्ये शनिवारी (दि.१४) बेल्जियमने भारताचा ४-२ असा पराभव केला. पहिल्या सामन्यातही बेल्जियमनेच बाजी मारली होती. तो सामना भारताने ३-१ असा गमावला. त्यानंतर अर्जेटिनाविरुद्ध ८-० असा मोठा पराभव पत्कारावा लागला.



या सामन्यात बेल्जियमने सुरूवातच आक्रमक केली. भारताच्या हार्दिक सिंगने उत्तम खेळ करण्याचा प्रयत्न केल्या. सामन्याच्या ७व्या मिनिटाला भारताला गोल करण्याची संधी मिळाली, मात्र तो गोल अपात्र ठरवला गेला. बेल्जियमने११व्या मिनिटाला पेनाल्टी कॉर्नरवर गोल करत १-० अशी आघाडी घेतली. भारताचा गोलकिपर सुरज कारकेराने प्रयत्न केले; मात्र, बेल्जियमने सत्राच्या शेवटच्या मिनिटाला आघाडी घेतली. त्यानंतर १४व्या मिनिटाला हेंड्रिक्सने गोल करत सामना २-० असा केला. दुसऱ्या सत्राची सुरूवात बेल्जियमने गोल करत केली. १७व्या मिनिटाला हेंड्रिक्सने ड्रॅग-फ्लिक करत गोल केला. बेल्जियमने ४-० अशी भलीमोठी आघाडी घेतली. त्यामुळे भारताच्या प्रयत्नांमध्ये वेग आला. आदित्याने गोल करत भारताला थोडासा दिलासा दिला. ४४ व्या मिनिटाला भारताला गोल करण्याची संधी होती, मात्र डोरेनने उत्तम कामगिरी करत तो गोल वाचवला. भारताच्या पवननेही दोन गोल वाचवले, त्यामुळे भारताच्या जिंकण्याच्या काही आशा निर्माण झाल्या होत्या. बेल्जियमच्या बचावफळीने मात्र त्यावर पाणी फेरले.

**महिला, पुरूष खो-खो स्पर्धेचे आयोजन | खेळाडूंच्या कामगिरीने मैदान दणाणले**

# अजितदादा पवार क्रीडा नगरीत 'डायनॅमिक' थरार

**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने व अमर हिंद मंडळातर्फे कै. उमेश शेणॉय स्मृती चषक पुरुष व महिला व्यावसायिक 'डायनॅमिक' खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्या आहेत. या स्पर्धा दादरमधील कै. अजितदादा पवार क्रीडा नगरीत रंगल्या असून मुंबईतील खो-खो प्रेमींसाठी हे मैदान आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. यावेळी खेळाडूंनी वेग, चपळाई, अचूक डावपेच आणि जिद्दीचे अप्रतिम दर्शन घडवले आहे. महिला आणि पुरुष गटातील साखळी सामन्यांत पश्चिम रेल्वे, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि बँक ऑफ इंडिया यांनी दमदार विजय नोंदवत विजेतेपदासाठी आपली दावेदारी भक्कम केली आहे.





महिला गटातील साखळी सामन्यात पश्चिम रेल्वेने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले आणि मुंबई पोलिसांवर २२-१३ असा ५:४० मिनिट राखून ९ गुणांनी विजय मिळवला. विजयी पश्चिम रेल्वेच्या कल्याणी कंक, अर्चना माजी, निसार के एम, सुहानी धोत्रे यांनी दमदार खेळ करत विजय निश्चित केला. पराभूत मुंबई पोलिसांच्या पायल पवार, श्रेया सनगरे, अंजली कनोजिया, दिक्षा सोनसुतकर यांनी चांगली झुंज दिली; मात्र, विजयापासून दूर राहिल्या.

महिला गटातील दुसऱ्या साखळी सामन्यात पश्चिम रेल्वेने महावितरण कंपनीचा २५-०२ असा १ डाव व २३ गुणांनी एकतर्फी पराभव करत आपली ताकद सिद्ध केली. विजयी पश्चिम रेल्वेच्या अर्चना माजी, किशोरी मोकाशी, कल्याणी कंक, शिवानी धोत्रे, संध्या सुरवासे यांनी सलग प्रभावी कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांना संधीच दिली नाही. पराभूत महावितरण कंपनीच्या मनाली काजारे, मिना कांबळे, देविका अहिरे यांनी प्रयत्न केले; मात्र, पश्चिम रेल्वेच्या भक्कम आक्रमणासमोर त्यांचा निभाव लागला नाही.

### व्यावसायिक खो-खोचा नवा अध्याय

कै. उमेश शेणॉय स्मृती चषक 'डायनॅमिक' खो-खो स्पर्धेत प्रत्येक सामना अधिक चुरशीचा आणि रोमांचक होत असून, खेळाडूंच्या उत्कृष्ट कौशल्याने अजितदादा पवार क्रीडा नगरी अक्षरशः दणाणून गेली आहे. वेगवान खेळ, अचूक बचाव आणि आक्रमणाच्या जोरावर संघ विजेतेपदासाठी झुंज देत असून, ही स्पर्धा खो-खोच्या व्यावसायिक युगाचा नवा अध्याय लिहित आहे.

पुरुष गटातील सामन्यात रचना नोटरी वर्कसने नाणेफेक जिंकून आक्रमण स्वीकारले; मात्र, बँक ऑफ इंडियाने २५-२३ असा २ गुणांनी थरारक विजय मिळवला. विजयी बँक ऑफ इंडियाच्या जर्नादन सावंत, विजय देठे, सुजल जायगडे, राज सकपाळ यांनी सलग प्रभावी कामगिरी करत विजय साकारला. पराभूत रचना नोटरी वर्कर्सच्या प्रथमेश दुर्गावळे, ओमकार मिरगळ, रुपेश कोंढाळकर, भावेश बने यांनी जोरदार लढा दिला.

पुरुष गटातील दुसऱ्या सामन्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेने नाणेफेक जिंकून आक्रमण स्वीकारले आणि मुंबई पोलिसांवर २८-२६ असा २ गुणांनी विजय मिळवला. विजयी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्जुन अनिवासे, संचित कंक, पियुश घोलम, अजय मित्र, सुरज खाके यांनी सलग उत्कृष्ट खेळ करत विजय निश्चित केला. पराभूत मुंबई पोलिसांच्या आकाश हजारे, अक्षय खापरे,, वेदांत देसाई, हनुमंत जगताप यांनी शेवटपर्यंत जोरदार प्रतिकार केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)